दैनिक

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

जनप्रभात

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ रविवार, दि.२९ डिसेंबर २०२४ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक ९७ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

जळगावच्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह दोघे ३ लाखांची लाच घेताना सापळ्यात

छत्रपती संभाजीनगर : नियुक्ती दिल्याचा मोबदला म्हणून तीन लाखांची लाच मागितल्याप्रकरणी जळगावचे प्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक अण्णा पाटील (वय ५६) व खासगी व्यक्ती भिकन मुकुंद भावे (दोघेही रा. जळगाव) हे दोघे छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाकडून लावण्यात आलेल्या सापळ्यात अडकले. गुरुवारी दुपारनंतर जळगाव येथील मेहरून तलावजवळील फ्लॅट न. ३, १० लेक होम अपार्टमेंट येथे ही कारवाई करण्यात आली. तक्रारदार यांची सीमा तपासणी नाका नवापूर येथे नोव्हेंबर २०२४ या महिन्यात नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित नियुक्ती दिल्याचा मोबदला म्हणून दीपक पाटील यांनी ४ डिसेंबर रोजी तीन लाख रुपये लाचेची मागणी करून रक्कम खाजगी व्यक्ती भिकन भावे याच्यामार्फत पंच, साक्षीदारांसमक्ष ५ डिसेंबर रोजी स्वीकारली. सापळा अधिकारी अमोल धस यांच्या पथकाने रक्कम स्वीकारताना दोघांनाही पकडले. या प्रकरणी जळगाव येथील एम.आय.डी.सी पोलीस ठाण्यात गुन्हा करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत विभागाकडून देण्यात आली.

राज्यात हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट तर डेंग्यूच्या रुग्णांमध्ये किंचित वाढ

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : हिवताप व डेंग्यूचे रुग्ण साधारणपणे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात सापडतात. मात्र वातावरणातील बदलामुळे यावर्षी संपूर्ण वर्षभर अधूनमधून रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत डेंग्यूच्या रुग्णांमध्ये किंचित वाढ झाली असली तरी हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट झाली आहे. मात्र हिवताप व डेंग्यूमुळे मृत्यू होण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे.

हिवतापाला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. या उपाययोजनांना काहीअंशी यश येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात २०२४ मध्ये हिवतापाचे १५ हजार ६७० रुग्ण सापडले. तर १८ जणांचा मृत्यू झाला. गतवर्षी हिवतापाचे १९ हजार ९६८ रुग्ण सापडले असून, २३ जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत रुग्णांच्या संख्येत साधारण ४ हजाराची घट झाली. तसेच मृतांची संख्याही कमी झाली आहे. मुंबईत सर्वाधिक ७ हजार ८०६ रुग्ण सापडले तर त्याखालोखाल गडचिरोलीमध्ये ६ हजार ५७६ रुग्ण सापडले आहेत. तसेच हिवतापाने सर्वाधिक १३ मृत्यू गडचिरोलीमध्ये झाले आहेत. त्याखालोखाल मुंबईत ५ जण, रायगडमध्ये दोन आणि ठाण्यात एकाचा मृत्यू झाला आहे.

हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट झाली असली तरी डेंग्यूच्या रुग्णांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा किंचित वाढ झाली आहे. मात्र मृतांच्या संख्येत घट झाली आहे. राज्यात २०२४ मध्ये डेंग्यूचे १९ हजार १६० रुग्ण सापडले तर २६ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र गतवर्षी राज्यात डेंग्यूचे १९ हजार ३४ रुग्ण सापडले होते, तर ५५ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे यंदा डेंग्यूच्या रुग्णांमध्ये १२६ इतकी वाढ झाली असली तरी मृत्यूला अटकाव करण्यात आरोग्य विभागाला काहिसे यश मिळाले आहे. डेंग्यूचे सर्वाधिक म्हणजे ५ हजार ८५१ रुग्ण मुंबईत सापडले असून, त्याखालोखाल कोल्हापूरमध्ये १ हजार २३८ रुग्ण, नाशिक शहरात १ हजार १९५ रुग्ण, रायगडमध्ये ७३७ रुग्ण, पालघरमध्ये ५६५ रुग्ण, साताऱ्यामध्ये ५४२, नागपूरमध्ये ४४६ रुग्ण, चंद्रपूरमध्ये ४२५ रुग्ण सापडले. तसेच डेंग्यूने सर्वाधिक म्हणजे पाच मृत्यू मुंबईत झाले. त्याखालोखाल रायगडमध्ये चार जणांचा आणि लातूर व नागपूरमध्ये प्रत्येकी दोघांचा मृत्यू झाला.

चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये वाढ

राज्यात चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाढ झाली आहे. जानेवारीपासून आतापर्यंत राज्यात चिकुनगुन्याचे ५ हजार ७५७ इतके रुग्ण सापडले तर गतवर्षी १ हजार ७०२ रुग्ण सापडले होते. २०२४ मध्ये चिकुनगुन्याचे सर्वाधिक म्हणजे १ हजार ८८ रुग्ण नागपूरमध्ये सापडले. त्याखालोखाल पुण्यात ७५१ रुग्ण, मुंबईत ७३५ रुग्ण सापडले.

गोंदियात चिमुकलीचा संशयास्पद मृत्यू; पोलिसांनी पुरलेला मृतदेह बाहेर काढला

वृत्तसंस्था ■ गोंदिया



गोंदिया : गोरेगाव तालुक्यातील हेटी येथील तीन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला. याप्रकरणी नातेवाईकांनी शंका उपस्थित केल्याने पोलिसांनी २४ तासानंतर पुरलेला मृतदेह बाहेर काढला. मृत चिमुकलीच्या मोठ्या आईने दिलेल्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुलीच्या मृत्यूप्रकरणात तिची आईच संशयाच्या भोवऱ्यात आहे. मानसी ताराचंद चामलाटे (३ वर्षे) असे मृत चिमुकलीचे नाव आहे.

मानसी ही आई गुनिता ताराचंद चामलाटे हिच्यासोबत नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा परिसरातील नांदा येथे वास्तव्यास होती. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास मानसीचा मृत्यू झाला. यावेळी मुलीचा मृतदेह घेऊन मानसीची आई स्वगावी पालेवाडा हेटी येथे आली. प्रकृती बरी नसल्याने मानसीचा मृत्यू झाला, असे तिने गावकऱ्यांना सांगितले. दरम्यान, शुक्रवारी दुपारी गावातील समशानभूमीत मानसीचा दफनविधी पार पडला. मात्र, नातेवाईकांनी व्यक्त केल्यानंतर मृत मानसीची मोठी आई कलाबाई यांनी शुक्रवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास गोरेगाव पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी पुरण्यात आलेला मृतदेह बाहेर काढला व शवविच्छेदनासाठी केटीएस रुग्णालय पाठवला. याप्रकरणी मृत मानसीच्या आईला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मृत मानसी आई गुनीता चामलाटे हिच्यासोबत नागपूर जिल्ह्यातील नांदा परिसरात राहत होती. तिथेच तिचा मृत्यू झाला व शुक्रवारी मूळ गाव हेटी येथे दफनविधी करण्यात आला. मात्र, दफनविधी करतेवेळी मानसीच्या शरिरावर काही व्रण दिसून आले. यावरून तिच्या आईने केलेल्या मारहाणीमुळे किंवा इतर कारणाने तिचा मृत्यू झाला असावा, असा संशय तक्रारदार कलाबाई चामलाटे यांनी तक्रारीत व्यक्त केला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर पुढील कारवाई केली जाईल. ही घटना खापरखेडा पोलीस ठाण्याच्या (नागपूर ग्रामीण) हद्दीतील असल्याने हे प्रकरण तेथे वर्ग करण्यात आले आहे.

युवकाच्या हत्येमुळे मूल शहरात तणाव; संतप्त नागरिकांचा चक्काजाम, अरोपीला अटक

वृत्तसंस्था ■ चंद्रपूर

चंद्रपूर : मूल तहसील कार्यालयासमोर रितिक शेंडे (२८) या युवकाची शुक्रवारी रात्री दहा वाजताच्या सुमारास तीन ते चार युवकांनी हत्या केली. शहरात तीन महिन्यातील ही दुसरी हत्येची घटना आहे. शुक्रवारी रात्री मूल पोलीस ठाण्यात नागरिकांनी एकत्र येत आरोपींच्या अटकेची मागणी लावून धरली. शनिवारी शवविच्छेदनानंतर संतप्त नागरिकांनी मूल तहसील आणि पंचायत समितीजवळील घटनास्थळी मृतदेह ठेवून चक्काजाम आंदोलन केले. यामुळे चंद्रपूर-गडचिरोली मार्गावरील वाहतूक खोळंबली. दरम्यान, शहरात तणावपूर्ण वातावरण असून पोलिसांनी आरोपी राहुल पासवान याच्यासह तीन आरोपींना अटक केली आहे, तर अन्य फरार आहेत.

मूल तहसील कार्यालयासमोर नगर पालिकेने उभारलेल्या बस थांब्यात रात्री दहा वाजताच्या सुमारास रितिक बसून होता. तीन-चार युवक तेथे आले आणि त्याच्याशी वाद घातला. या वादाचे पर्यावसण हाणामारीत झाले. आरोपींनी चाकूने वार करून रितिकला गंभीर जखमी केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला रितिक आरडाओरड करित होता. त्याच वेळी काही नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतले. मूल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची वार्ता शहरात वाऱ्यासारखी पसरली. कुटुंबीय, समाज बांधव, नागरिकांनी घटनास्थळी आणि पोलीस ठाण्यात गर्दी केली. शनिवारी सकाळपासूनच उपजिल्हा रुग्णालयात स्थानिक नागरिकांची आणि कुटुंबीयाची गर्दी झाली होती. आरोपींना अटक करा, अशी मागणी जमावाने केली. रितिकची हत्या कोणत्या कारणासाठी झाली, याचा अद्याप उलगडा होवू शकला नाही. पुढील तपास सुरू आहे.

कडकडीत बंद

रितिक शेंडे हत्येच्या निषेधार्थ मूलमध्ये शनिवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. बाजारपेठ शंभर टक्के बंद होती. मूलमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून, चरस, गांजाची मोठ्या प्रमाणात विक्री आणि सेवन केल्या जात आहे. अवैध धंद्यांत वाढ झाली आहे. यातूनच गुन्हेगारी वाढल्याचे बोलले जाते. स्थानिक पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आहे. मूलमध्ये दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले आहे. उपजिल्हा रुग्णालय आणि गांधी चौकात पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवलेला आहे. तीन महिन्यांपूर्वी मूलमध्ये प्रेमचरण कांबळे या युवकाची अशाच पद्धतीने हत्या करण्यात आली होती, तर चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोष रावत यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता.

आरोपींना अटक

मूल हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल सत्तन पासवान (२०) व त्याचे सहकारी अजय दिलीप गोटेफोडे (२२) व एका अल्पवयीन आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चंद्रपूर शहरातून अटक केली आहे.

बाणेरमध्ये लाचखोर तलाठ्यासह दोघांना पकडले, वारस नोंद करण्यासाठी दहा हजारांची लाच

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : वारस नोंद करण्यासाठी एकाकडून दहा हजार रुपयांची लाच घेणाऱ्या बाणेरमधील तलाठ्यासह मध्यस्थाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले. एसीबीच्या पथकाने तलाठ्याच्या मोटारीची तपासणी केली. तेव्हा मोटारीत तीन लाख रुपयांची रोकड आढळून आली. याप्रकरणी तलाठ्यासह मध्यस्थाविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी तलाठी उमेश विठ्ठल देवघडे (वय ३९), मध्यस्थ काळूराम ज्ञानदेव मारणे (वय ३९, रा. दांडेकर पूल, सिंहगड रस्ता) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारदाराच्या वडिलांची बाणेरमध्ये जमीन आहे. वडिलांनी त्यांच्या मृत्यूपत्रात संबंधित जमीन तक्रारदाराच्या पत्नीच्या नावे केली होती. २९ ऑगस्ट रोजी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वारस नोंद करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह बाणेर येथील तलाठी कार्यालयात अर्ज केला होता.

त्यानंतर तक्रारदार १८ डिसेंबर रोजी बाणेर येथील तलाठी कार्यालयात गेले. त्यांनी तलाठी उमेश देवघडे यांची भेट घेतली. तक्रारदाराच्या पत्नीचे वारस म्हणून नाव नोंदविण्यासाठी देवघडे यांनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदारांनी पैसे कमी करण्यास सांगितले. तडजोडीत त्यांनी देवघडे यांना दहा हजार रुपयांची लाच देण्याचे मान्य केले. त्यानंतर शुक्रवारी एसीबीच्या पथकाने बाणेर येथील तलाठी कार्यालयात सापळा लावला. तक्रारादारकडून मारणेने तलाठी दे?वघडे यांच्यासाठी दहा हजारांची लाच स्वीकारली. एसीबीच्या पथकाने त्याला पकडले. चौकशीत त्याने देवघडे यांच्यासाठी लाच स्वीकारल्याचे कबुली दिली. पथकाने देवघडे यांच्या मोटारीची तपासणी केली. तेव्हा मोटारीत तीन लाख रुपयांची रोकड सापडली. एसीबीचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक नीता मिसाळ तपास करत आहेत.

ऐन थंडीत मुंबईत पावसाचा शिडकावा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : गेले दोन तीन दिवस मुंबईतील तापमानात बऱ्यापैकी घट झाली असल्याने पहाटे तसेच रात्री गारवा जाणवत आहे. त्यातच शुक्रवारी मध्यरात्री शहर तसेच उपनगरांत पावसाचा शिडकावा झाला. दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस संपूर्ण राज्यात पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. आजदेखील काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे.

मुंबईत गेले दोन तीन दिवस अंशतः ढगाळ वातावरण, धुके आहे?. परिणामी मुंबईतील धुरक्याच्या पातळीतही वाढ झाली आहे. मुंबईमध्ये या धुरक्यामुळे सर्वदूर प्रदूषणाचे प्रमाण देखील वाढलेले आहे. हवामान विभागाने मुंबईसाठी पावसाचा अंदाज वर्तवला नसला तरी, शुक्रवारी मध्यरात्री तसेच पहाटे परळ, भायखळा, दादर, पवई, अंधेरी परिसरात पावसाचा शिडकावा झाला.

दक्षिण केरळ लगत अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे आणि पश्चिमी चक्रावात अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातून होणारा बाष्पाचा पुरवठा यामुळे राज्यात ढगाळ वातावरण राहील. तसेच पावसाला देखील पोषक वातावरण तयार झाले आहे, असे हवामान विभागाने सांगितले. दरम्यान, पुढील दोन तीन दिवस मुंबईत पहाटे दाट धुके पहायला मिळेल. तसेच संपूर्ण दिवस ढगाळ वातावरण असेल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

वादळी वाऱ्यासह पाऊस कुठे ?

जळगाव, जालना, बीड, नागपूर, अमरावती, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर

हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस कुठे पुणे, अकोला, बुलढाणा, परभणी, हिंगोली, सातारा सांगली, सोलापूर

ॲलोपॅथी औषधे देण्याची होमिओपॅथी डॉक्टरांना परवानगी; अन्न, औषध प्रशासनाचा निर्णय

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : महाराष्ट्र वैद्याकीय परिषदेच्या नियमानुसार 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (सीसीएमपी) हा सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणारे होमिओपॅथी डॉक्टर नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिक म्हणून नोंदणीस पात्र ठरतात. या नियमानुसार होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे विक्री करण्यास तसेच त्यांच्या चिठ्ठीवर रुग्णांना औषध विक्री करण्यास औषध विक्रेत्यांना अन्न व औषध प्रशासनाने परवानगी दिली आहे.

औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नियम १९४५ मधील नियम २(ईई) नुसार नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांच्या औषध चिठ्ठी आधारेच रुग्णांना औषध विक्री करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र वैद्याकीय परिषद १९६५ अंतर्गत नमूद अनुसूचीमध्ये ती व्यक्ती या कायद्यांतर्गत नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिक म्हणून नोंदणी करण्यास पात्र ठरते. त्यामुळे सर्व औषध विक्रेते हे सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) पूर्ण करणाऱ्या होमिओपॅथी नोंदणीकृत डॉक्टर ॲलोपॅथी औषधांची विक्री करू शकतात.

तसेच किरकोळ औषध विक्रेते हे या डॉक्टरांद्वारे देण्यात आलेल्या औषधांच्या चिठ्ठीद्वारे रुग्णांना औषध विक्री करू शकतात. मात्र ही औषध विक्री करताना औषध चिठ्ठीवर नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांचा नोंदणी क्रमांक व सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) प्रमाणपत्राचा क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. औषध चिठ्ठीवर या बाबी नमूद असल्याची खात्री करण्याची जबाबदारी औषध विक्रेत्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे राज्यामध्ये होमिओपॅथी डॉक्टर स्वतः रुग्णांना ॲलोपॅथी औषधांची विक्री करू शकतात. तसेच त्यांच्या चिठ्ठीवर ॲलोपॅथी औषधे मिळण्याचा मार्गही मोकळा झाला आहे.

निर्णय काय?

राज्य शासनाने मान्यता दिलेला 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (सीसीएमपी) उत्तीर्ण केला असल्यास संबंधित वैद्याकीय व्यावसायिकांचा नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांमध्ये समावेश करण्यात येतो.

त्यामुळे 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' हा कोर्स पूर्ण करणाऱ्या वैद्याकीय व्यावसायिकाला आधुनिक चिकित्सा पद्धतीची औषधे वापरून वैद्याकीय व्यवसाय करण्याची परवानगी दिली आहे.

सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात प्रथम; दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. या योजनेच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आल्याची माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी दिली.

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकाळ पैसे भरूनही पंप मिळाले नसल्याचा (पेड पेंडिंग) प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला असून त्यानुसार या योजनेला गती देण्यात आली आहे.

संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले. या योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

दिवसा कधीही सिंचन करता येणे शक्य

सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्वाधिक आकडेवारी डिसेंबर महिन्यातील

राज्यात महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात २१ हजार ९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले, अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. सन २०१५ ते २०२३ पर्यंत विविध योजनेत एक लाख ८० हजार सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, यावर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात एक लाख ५८ हजार सौर पंप बसविण्यात आले आहेत.

कुर्ल्यात भंगार गोदामांना भीषण आग

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : कुर्ल्याच्या खैराणी रोड परिसरात असलेल्या काही गोदामांना शनिवारी सकाळी भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र अनेक गोदामे जळून खाक झाली आहेत.

शनिवारी पहाटे सहाच्या सुमारास खैराणी रोड येथील वाजीदअली कंपाऊंड परिसरात ही भीषण आग लागली होती. या परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, लाकूड, ज्वलनशील पदार्थ आणि भंगाराची गोदामे आहेत. शनिवारी पहाटे त्यातील एका गोदामात आग लागली. आगीची माहिती मिळताच तेथील कामगारांनी बाहेर पळ काढला आणि तत्काळ अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. त्यानुसार अग्निशमन दलाच्या ११ गाड्या तेथे दाखल झाल्या होत्या.

अग्निशमन दलाच्या जवानांनी सकाळी आकाराच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत तेथील आठ ते दहा गोदामे पूर्णपणे जळून खाक झाली होती. सुदैवाने त्या आगीमध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात मालाचे नुकसान झाल्याची माहिती तेथील स्थानिकांनी दिली आहे.

खैराणी रोड परिसरात मोठ्या प्रमाणात गोदामे असल्याने तेथील रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाहने उभी केली जातात. त्यामुळे तेथे वाहतूक कोंडी असते. शनिवारी आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनाही वाहतूक कोंडीमुळे घटनास्थळी पोहोचण्यास उशीर झाला. त्यामुळे आगीची तीव्रता अधिक वाढली, अशी माहिती काही स्थानिकांनी दिली आहे.

संपादकीय...

मार्दवी मार्तंड!...

आज काँग्रेस राजकीय पक्ष म्हणून जी तळमळ दाखवतो त्याच्या निम्मे जरी शहाणपण तो पक्ष सिंग यांच्या दुसऱ्या खेपेस दाखवता तर त्या पक्षाची आज ही दशा न होती.मनमोहन सिंग यांच्यासारखी व्यक्ती जाते तेव्हा त्यांनी काय कमावले, यापेक्षा मागे राहिलेल्यांनी काय गमावले याचा जमाखर्च मांडणे उर्वरितांसाठी उपयोगाचे.ही २००९ सालातल्या जूनची गोष्ट. विख्यात गायिका शमशाद बेगम यांस पद्मभूषण देण्याचा सोहळा राष्ट्रपती भवनात होता. त्यावेळी एक महिला त्यांच्याजवळ गेली आणि म्हणाली: मी तुमची खूप मोठी चाहती आहे. ते ऐकून सुखावलेल्या शमशाद साहिबा शुक्रिया अदा करत तीस विचारत्या झाल्या: आप क्या करती हो. ती महिला म्हणाली "काही नाही, मी गृहिणी आहे". त्यावर आश्चर्यचकित झालेल्या शमशाद बेगम यांचा त्या महिलेस प्रश्न होता: यहाँ कैसे? त्या प्रश्नावर एक मंद स्मित करीत ती महिला म्हणाली: मेरे शोहर प्राईम मिनिस्टर है! मनमोहन सिंग हे त्या महिलेचे शोहर. हा कमालीचा साधेपणा ही मनमोहन सिंग यांची आणि त्यांच्या कुटुंबाची ओळख. ती त्यांच्या धवल पंजाबी पेहेरावाइतकी आयुष्यभर निष्कलंक राहिली. एक नोकरशहा, आर्थिक सल्लागार, अर्थभाष्यकार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि नंतर सलग दहा वर्षे पंतप्रधान ही त्यांच्या आयुष्याची चढती भाजणी तब्बल ७० वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यानंतर आता अनंतात विलीन होईल. हा क्षण मनमोहन सिंग यांच्या निधनाने आपण नक्की काय गमावले याचा आठव समोर मांडण्याचा. सर्वसाधारणपणे या निमित्ताने गौरवांकित गवगवा होईल तो त्यांच्या आर्थिक सुधारणांचा. त्यांनी अर्थमंत्री म्हणून देशास कसे प्रगतिपथावर नेले त्याचा. आणि पंतप्रधानपदावरील त्यांच्या कारकीर्दीचा. तसे होणे योग्यच. शेवटी सामान्यजनांच्या नजरेतून यशाचे मोजमाप हे त्या व्यक्तीने काय कमावले यात असते. तथापि मनमोहन सिंग यांच्यासारखी व्यक्ती ज्यावेळी जाते त्यावेळी त्यांनी काय कमावले यापेक्षा मागे राहिलेल्यांनी काय गमावले याचा जमाखर्च मांडणे उर्वरितांसाठी उपयोगाचे असते. शालेय वयातच अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून लौकिक मिळवणारे गरीब घरातले मनमोहन कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना, लबाडीच्या राजकारणात हात बरबटवलेले नसताना, पंतप्रधानपदापर्यंतच्या शिखराकडे नजर ठेवत त्या दिशेने आपली कारकीर्द बेतत नसताना त्या पदावर जातात ते या देशातील राजकीय व्यवस्थेचे यश असते. तथापि सत्तासोपानाच्या पायऱ्या न चढता थेट सर्वोच्च पदी नेमली गेलेली व्यक्ती हुकूमशाही वृत्ती दर्शवण्याचा धोका असतो. कारण लोकशाही ही मुंबईतील लोकलसारखी अनेकांस सामावून घेणारी असावी लागते. मनमोहन सिंग यांना कारकीर्दीच्या अंतिम टप्प्यापर्यंत असे काही कोणास सामावून घ्यावे लागले नाही. तरीही लोकशाही मार्गाने निवडून येणाऱ्या नेत्यांपेक्षा मनमोहन सिंग हे सर्वार्थाने अधिक लोकशाहीवादी होते. लोकशाही हे तत्त्व म्हणून सिंग यांच्या अंगी पुरते भिनलेले होते. त्याची प्रमुख उदाहरणे दोन: स्वतः उच्च दर्जाचे अर्थवेत्ते असलेले मनमोहन सिंग जेव्हा पंतप्रधान यासारख्या सर्वोच्च पदी नेमले जातात तेव्हा त्यांचा महत्त्वाचा निर्णय असतो रंगराजन यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञास सल्लागारपदी नेमणे, हा. दुसरे उदाहरण त्यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या टप्प्यातले. त्यांचे एकेकाळचे सहकारी माँटेकसिंग अहलुवालिया यांच्या पत्नी ईशर यांनी दिल्लीत एका परिसंवादात उपस्थित राहण्याचे निमंत्रण मनमोहन सिंग यांस दिले. विषय अर्थशास्त्र आणि नियोजन यांच्याशी संबंधित असल्याने सिंग त्यास हजर राहिले. त्या वेळी त्यांच्या समोरच त्यांच्या 'यूपीए' सरकारच्या आर्थिक धोरणांवर सडकून टीका झाली. त्यात सर्वात धारदार टीकास्त्र चालवणाऱ्या तरुण प्राध्यापकास सिंग यांनी देशाचा अर्थसल्लागार नेमले आणि नंतर त्याच्याकडे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद दिले. रघुराम राजन ही आठवण आजही सांगतात. पंतप्रधानपदावरील व्यक्ती त्यांच्याच नेतृत्वाखालील सरकारवरील टीकेची इतकी सहिष्णू वृत्तीने दखल घेते आणि त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी टीकाकारांपुढे सहकार्याचा हात मागते हे सच्चा लोकशाहीवादीच करू शकतो. मनमोहन सिंग असे होते. खरे तर त्यांच्या एका अर्थसंकल्पामुळे या देशाच्या अंगणात लक्ष्मीची पावले उमटली. त्यांनी २४ जुलै १९९१ या दिवशी मांडलेल्या अर्थसंकल्पामुळे देशाची आर्थिक कवाडे सताड उघडली गेली आणि परदेशी गुंतवणुकीचा ओघ भारताकडे वळला. त्यावेळचे पंतप्रधान नरसिंह राव यांनी अर्थसंकल्प मांडला गेला त्याआधी दुपारी एक पत्रकार परिषद घेऊन आयात, गुंतवणूक यावरील अनेक निर्बंध उठवले. यातून 'पंतप्रधान पत्रकार परिषद घेत' ही एकच बाब लक्षात घेणे चुकीचे. पंतप्रधानांनीही पत्रकार परिषद अर्थसंकल्पाच्या दिवशीच घेतली कारण आपल्या सर्व घोषणांचा अंतर्भाव हा अर्थसंकल्पात होईल हा त्यामागचा राव यांचा विचार. यातून आपल्या मंत्र्यालाही त्याच्या कर्तबगारीचे श्रेय द्यायला हवे, एवढा मोकळेपणा त्यांच्याकडे होता आणि सर्व प्रकाशझोत फक्त आपण आणि आपल्यावरच राहावा ही त्यांची वृत्ती नव्हती हे जसे दिसते तसेच असे काही क्रांतिकारक निर्णय पेलण्याची सिंग यांची क्षमता किती होती हेदेखील दिसून येते. तरीही अर्थशास्त्रातले सर्व काही आपणालाच ठावे असा त्यांचा आविर्भाव कधीही नव्हता. रंगराजन, रघुराम राजन आदींच्या त्यांनी केलेल्या नेमणुकांतून हे दिसून येते. मृदू आणि मस्तवाल या दोन टप्प्यांतच राजकारण्यांस अनुभवण्याची सवय लागलेल्या भारतीयांस सिंग यांच्या रूपाने मृदू तरीही ठाम राजकारणी पाहता आला. आर्थिक विषयांची आणि देशापुढील प्रश्नांची सखोल समज हे या ठामपणामागचे कारण. त्यामुळेच 'व्हेन मनमोहन सिंग स्पीक्स, पीपल लिसन' अशी सहज दाद त्यावेळचे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी दिली होती. या दोघा नेत्यांची विशेष मैत्री असल्याचे ऐकिवात नाही. पण जगभरातील नेत्यांच्या पहिल्या पसंतीचे नेते असा लौकिक त्यांनी २०१० पर्यंत कमावल्याचे 'न्यूजवीक'ने नोंदवले होते. पंतप्रधानपदाच्या पहिल्या कारकीर्दीत अणुकराराच्या मुद्द्यावर त्यांनी आपले पंतप्रधानपदच नव्हे तर सारे सरकारच पणास लावले. "माझे सरकार पडले तरी बेहत्तर; पण अणुकरार मागे घेणार नाही" ही अशक्त म्हणून हिणवल्या गेलेल्या सिंग यांची कृती पुढील काळात स्वतःचे सरकार वाचवण्यासाठी चार-चार सुधारणा विधेयके मागे घेणाऱ्या नेत्यांस काही शिकवू शकली नाही, यास काय म्हणावे? दुसरे असे की त्यावेळी विरोधी पक्षात असलेल्यांनी सिंग यांच्या या अणुकरारावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली आणि नंतर सत्तेवर आल्यावर त्याच अणुकराराचा पाठपुरावा केला. तरीही एव्हाना पंतप्रधानपदावरून पायउतार झालेल्या सिंग यांनी "बघाष्ठ शेवटी मीच बरोबर ठरलो" असा परिचित राजकीय विजय कधीही साजरा केला नाही. तशी संधी खरे तर २०१४ नंतर सिंग यांच्यासमोर अनेकदा आली. मग तो 'मनरेगा'चा मुद्दा असो वा 'आधार' कार्ड असो वा 'वस्तू व सेवा कर (जीएसटी)' असो. ज्यांनी 'मनरेगा'स "मूर्तिमंत भ्रष्टाचार" म्हटले, 'आधार' कार्ड कल्पनेस "घटनाबाह्य" ठरवले आणि 'जीएसटी' "होऊ देणार नाही" असा निर्धार केला, त्यांच्यावरच या सर्व योजना राबविण्याची वेळ आली. हा खरा काव्यात्मक न्याय. म्हणजे मनमोहन सिंग यांनी जे जे केले ते ते तसेच नंतरच्या काळात राबवले गेले. तथापि हे त्यावेळेस सिंग यांच्या काँग्रेस पक्षास कळले नाही, हे खुद्द मनमोहन सिंग यांचे तसेच देशाचेही दुर्दैव. राहुल गांधी यांची त्या काळातील अध्यादेश फाडण्याची तडफदार (?) कृती आणि सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील 'राष्ट्रीय सल्लागार परिषद' यामुळे सिंग यांचा अधीक्षेप होत गेला हे अमान्य करता येणार नाही. ज्या काँग्रेस पक्षाने सिंग यांस पंतप्रधानपद दिले त्याच काँग्रेस पक्षाच्या धुरीणांनी या पदावरील सिंग यांस दुसऱ्या खेपेस सन्मानाने काम करू दिले नाही. आज काँग्रेस राजकीय पक्ष म्हणून जी तळमळ दाखवतो त्याच्या निम्मे जरी शहाणपण तो पक्ष सिंग यांच्या दुसऱ्या खेपेस दाखवता तर त्या पक्षाची आज ही दशा न होती. सिंग यांचे मोठेपण असे की हे सर्व त्यांनी सहन केले आणि कधीही पक्षांतर्गत वा बाहेरील विरोधक यांच्याविषयी अवाक्षर काढले नाही. विरोधकांनी तर त्यावेळी अण्णा हजारेदी बुणग्यांना पुढे करून मनमोहन सिंग यांस घायाळ केले आणि बाबा रामदेव यांच्यासारख्यांनी त्यावेळी सिंग यांस अर्थशास्त्रावर सुनावले. भारतीय राजकारणाचा हा तळबिंदू होता. त्यात मनमोहन सिंग यांच्यासारखी सभ्य, सुसंस्कृत व्यक्ती गुरफटली गेली हा आपला राजकीय दैवदुर्विलास. हे सर्व हलाहल मनमोहन सिंग यांनी सहज प्राशन केले. तरीही ते कधी कडवट झाले नाहीत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांची राज्यसभा मुदत संपली त्यावेळी 'लोकसत्ता'ने 'बडबड बहरातील मौनी' (४ एप्रिल) या संपादकीयाद्वारे त्यांच्या कारकीर्दीचा यथोचित आढावा घेतला. आता ते गेले. संत ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' मार्तंडाचे वर्णन तापहीन असे करते. म्हणजे आपल्या तेजाने इतरांस न जाळणारा सूर्य 'जनप्रभात' परिवाराची या मधुरमार्दवी मार्तंडास मनःपूर्वक आदरांजली.

दलितांच्या उद्धारार्थ झटलेले कर्मवीर कोण?

(कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्मृतिदिन विशेष)



दलितांच्या उद्धारासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. महाडचा सत्याग्रह व नासिकचा काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह यांत ते आघाडीवर होते. त्यावेळी त्यांना निर्दय मारपीट सहन करावी लागली व तुरुंगातही जावे लागले होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी देत आहेत... संपादक.

भाऊराव कृष्णराव गायकवाड ऊर्फ दादासाहेब गायकवाड हे भारतीय राजकारणी, समाजसेवक आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी होते. ते डॉ.आंबेडकरांचा वारसा लाभलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष होते, तसेच पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य होते. मुंबई विधानसभेचे सदस्य- आमदार, लोकसभा सदस्य व राज्यसभा सदस्य- खासदार म्हणून त्यांनी कार्य केलेले आहे. डॉ.बाबासाहेबांच्या अनेक कामांत दादासाहेबांचा सहभाग होता. दि. २ मार्च १९३०च्या वेळी डॉ.आंबेडकरांना दादासाहेबांची खुप मदत झाली. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली आणि बाबासाहेबांच्या पुढाकाराने दिलेल्या लढ्याचा एक भाग म्हणजे हा सत्याग्रह होता. काळाराम मंदिर हे नाशिक मधील प्रसिद्ध रामाचे मंदिर आहे. त्यांच्या मानसन्मानार्थ - कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाद्वारे २००२पासून दिला जाणारा पुरस्कार आहे.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

दादासाहेबांच्या नावाने महाराष्ट्र राज्य सरकारची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना या नावाची एक योजना सन २००४पासून सुरू आहे. सन २०१२साली तिचा लाभ ३८ भूमिहीनांना झाला होता. मात्र त्यापूर्वी केवळ २५० लोकांना जमिनी मिळाल्या होत्या. भारत सरकारने गायकवाडांना इ.स.१९६८मध्ये पद्मश्री हा पुरस्कार दिला. नाशिकमध्ये एका सभागृहाला दादासाहेब गायकवाड सभागृह नाव दिले आहे. मुंबईत अंधेरीभागात दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र नावाची संस्था आहे. दादासाहेब गायकवाड यांचा परिचय करून देणारी एक १३ मिनिटांची डॉक्युमेंटरी फिल्म सुद्धा तयार केली आहे.

भाऊराव कृष्णराव गायकवाड हे विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ज्येष्ठ सहकारी, दलित समाजाचे नेते व सुधारक होते. ते सर्वसामान्य लोकांत दादासाहेब या नावाने ओळखले जात. दादासाहेबांचा जन्म नासिक येथे दि. १५ ऑक्टोबर १९०२ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. तेथील सरकारी माध्यमिक शाळेत त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर डॉ.आंबेडकरांसमवेत त्यांनी दलितोद्धाराच्या कार्यास सुरुवात केली. सन १९४२ ते ४६ या काळात ते सरकारी नोकरीत होते. त्यांनी जालंदर व कुरुक्षेत्र येथे निर्वासितासांठी खास अधिकारी म्हणूनही काम केले. नासिकच्या ज्ञानविकास केंद्र या शिक्षणसंस्थेचे तसेच नागपूरच्या डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष, तसेच पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे ते सदस्य होते. प्रबुद्ध भारत या साप्ताहिकाच्या संपादक मंडळाचे अध्यक्ष तसेच मुंबई येथील शेड्यूल्ड कास्ट्स इंप्रूव्हमेंट ट्रस्टचे ते विश्वस्त व सदस्य होते. नासिक, नागपूर, पुणे, मुंबई आदी ठिकाणच्या अनेक सार्वजनिक संस्थांशी ते या ना त्या प्रकारे निगडित होते. ते मुंबई विधानसभा तसेच लोकसभा यांचे सदस्य होते. लोकसभेत रिपब्लिकन पक्षाच्या गटाचे नेतेही राहिले होते. नंतर त्यांची राज्यसभेवर निवड झाली. सन १९५३मध्ये त्यांना भूमिविषयक सत्याग्रहात तुरुंगवास भोगावा लागला. त्यानंतर त्यांनी भूमिहीनांना भूमी मिळावी, म्हणून मोठे आंदोलन सुरू केले होते. त्यांनी विश्वरत्न डॉ.आंबेडकरांसोबत बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्यासोबत प्रथमपासून त्यांनी आघाडीवर राहून काम केले. त्यांच्या गुणांची आणि नेतृत्वाची अनेक वेळा कसोटी लागली. डॉ.बाबासाहेबांचे एक ज्येष्ठ, विश्वासू व कर्तबगार सहकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. साधी राहणी, मनमिळाऊ स्वभाव, विशुद्ध चारित्र्य, प्रखर ध्येयनिष्ठा, प्रभावी वक्तृत्व, अन्यायाविरुद्ध झगडण्याची जिद्द इत्यादी गुणांमुळे त्यांचे नेतृत्व आदरणीय ठरले.

सन १९६८ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा व समाजसेवेचा गौरव केला. त्यांच्या कार्यरत जीवनामुळेच लोक त्यांना कर्मवीर ही उपाधी लावत होते. दि. २९ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे अशा या थोर समाजसुधारक दादासाहेबांचे निर्वाण झाले.

!! स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या अविस्मरणीय कार्यांना मानाचा लवून मुजरा आणि पावन चरणी लेखरुपी ही शब्दसुमने !!

चर्चा...

अत्याचाराची
घटना
प्रकाशांत येता चर्चा
गल्लीबोळांतकेसेस
उसळू लागतो मोर्चा

शांत बसला
अन्याय
हळूहळू फोडे वाचा
करा एफ आय आर
हलू लागल्या खुर्च्या

कायकेले इतके दिस
झापेलोकां खालच्या
त्वरीतकेली कारवाई
सन्मान मिळे वरच्या

परेड घेई संशयितांची
खेळतात लिंबू चमचा
चालू राहतो फूटबॉल
आरोपी आहे तुमचा

खोटी केस कधीकधी
उकरू काढला ढाचा
केसेस निंदिस्त कशा
कळत ना काय लोचा

कोषात गोषात लुप्त
रे कहाण्या ज्या सच्या
बदनाम करावी यंत्रणा
भांडवल मिळे लुच्या

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

जातीय...

जातीय
राजकारण
बदलू लागली?
दिशा
प्रत्येकजण आपली
आजमावे भाग्यरेषा

जहाल झाले मवाळ
का यू टर्न घेते भाषा
गुंगून जातात सगळे
मोहविते सत्ता नशा

प्रकाश तिरीप नको
गडद अंधारी निशा
स्वताचं सर्व सत्ताक
बदलायं लागलेपेशा

मिडाससम्राट पागल
हपापला स्वर्णस्पर्शा
घालवून बसेलंआप्त
मृगजळाच्याआकर्षा

सुरवंटाचेफुलपाखरू
फोडून येई महाकोषां
जमल्या अनेक माशा
आसुसल्या मधुकोषा

वाढतच चालली इर्षा
कुंपण नसते संतोषा
रे सत्ताचं अंतीम सत्य
जाणीव तीव्रते प्रकर्षा

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६...

!!! संतू तेली अर्थात संत संताजी जगनाडे महाराज !!!

(संत संताजी जगनाडे महाराज स्मृतीदिन विशेष)



संत श्री संताजी जगनाडे महाराज यांचा जन्म दि.८ डिसेंबर १६२४ रोजी महाराष्ट्र राज्यात पुणे जिल्ह्यातल्या मावळ तालुक्यातील सुदुंबरे या गावी विठोबा जगनाडे यांच्या घरी झाला. वडिल विठोबा जगनाडे व आई माथाबाई हे विठ्ठलभक्त होते, त्यामुळे संताजींवर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले. तेली समाजातील घर असल्यामुळे मुलांला हिशोब करता येणे गरजेचेच होते, त्यामुळे संताजी महाराजांना देखील लिहिता वाचता आणि हिशोब करता येईल एवढे शिक्षण घेतले होते. घरची परिस्थिती चांगली होती त्यामुळे संताजी महाराजांना कसली कमी पडली नाही.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

संताजींवर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले. कीर्तनाला, भजनाला जाण्याची सवय लागली. कीर्तनाची आवड त्यांच्यात बालपणीच निर्माण झाल्यामुळेच ते नंतर संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांपैकी एक झाले. त्याच बरोबर त्यांना जसा वेळ मिळेल त्यानुसार भजनाला कीर्तनालाही जात असत. त्यांच्यावर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार असल्यामुळे त्यांचे कुटुंबापेक्षा जास्त लक्ष सामाजिक कार्यात होते.

त्या काळी संतांचे समाजाला कीर्तनांच्या आणि अभंगांच्या माध्यमातून शिकवण देण्याचे कार्य चालू होते. तेव्हा संत तुकाराम महाराजांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात झाली होती. असेच एकदा तुकाराम महाराज संताजींच्या गावी कीर्तनासाठी आले होते. त्यांची कीर्तने ऐकून संताजींवर तुकारामांचा मोठा प्रभाव पडला व त्यांनी संसार सोडण्याच्या निर्णय घेतला. तेव्हा तुकारामांनी संताजीना समजावून सांगितले, की संसारात राहूनही परमार्थ साधता येतो आणि तेव्हापासून संताजी जगनाडे महाराज- संतू तेली हे संत तुकारामाच्या टाळकऱ्यांमध्ये सामील झाले. संत तुकारामांच्या सावलीत राहून त्यांनी तुकारामांचे अभंग उतरवून घेण्यास सुरुवात केली. शेवटच्या क्षणी माती टाकण्यास येणार असे वचन संत तुकारामांनी संताजीना दिले होते. परंतु तुकाराम हे संताजी जगनाड्यांच्या अगोदरच वैकुंठाला गेले. असे म्हणतात की, जेव्हा संताजी वारले तेव्हा अंत्य संस्काराच्यावेळी कितीही प्रयत्न केले तरी काही संताजींचे पूर्ण शरीर गाडले जात नव्हते, त्याचा चेहरा वरच राहत होता. तेव्हा वैकुंठाहून संत तुकाराम महाराज आपले वचन पूर्ण करण्यासाठी आले व त्यांनी तीन मुठी माती टाकल्यानंतर संताजींचा पूर्ण देह झाकला गेला.

जगद्वंद्य जगद्गुरू संतशिरोमणी तुकारामजी महाराजांचे वंशज गोपाळबाबा मोरे यांनी म्हंटले आहे,

'संताजी तेली बहु प्रेमळ ।
अभंग लिहित बसे जवळ ।।
धन्य त्याचे सबळ । संग सर्वकाळ तुक्याचा ।।'

संताजींच्या अथक परिश्रमामुळेच तुकारामांची अभंगाची गाथा जिवंत राहू शकली, असे म्हंटले आहे.

।। संत संताजी जगनाडे महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन ।।

यंदा नवी मुंबईत १ अब्ज ३७ कोटींहून अधिक रुपयांची सायबर लूट

वृत्तसंस्था ■ नवी मुंबई



नवी मुंबई : नवी मुंबईत जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे. तर ४० कोटी ४३ लाख ४४ हजार ४५६ एवढी रक्कम गोठविण्यात पोलिसांना यश आले. ११ महिन्यात ज्यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत अशा ६२ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. कमी गुंतवणुकीवर भरघोस नफा मिळवण्याचा मोह, आणि सायबर गुन्ह्याबाबत अज्ञान या मुख्य कारणांनी ही फसवणूक झाली असून तक्रार उशिरा देणे आणि तपास अत्यंत किचकट असल्याने गुन्हेगारांचे फावते आहे.

सट्टा बाजारात गुंतवणूक करा अल्पवधीत भरघोस परतावा मिळावा, आम्ही पाठवलेल्या युट्यूब लिंकला लाईक सबस्क्राईब करा घरबसल्या रिवॉर्ड मिळवा, केवळ पॉईंट द्या आणि लाखो रुपये कमवा अशा फसव्या जाहिरातींना बळी पडलेल्या लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच केंद्रीय अन्वेषण किंवा सीआयडी मधून बोलत असल्याची थाप मारत डिजिटल अटक, तुमच्या खात्यातून अतिरेक्यांना पैसे गेले आहेत अशी धमकी देत पैसे घेतले जातात. तसेच ऑनलाइन कॅमेरा चॅटिंग मध्ये अश्लील बोलून बीभत्स चाळे करण्यास भाग पाडणे आणि त्याची रेकॉर्डिंग करून पैशांची मागणी करणे असेही प्रकार घडले आहेत. यावर्षीची आकडेवारी चक्रावणारी असून ऑनलाइन फ्रॉडचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे.

गुन्हा नोंद होताच ज्या बँकेत तक्रारदाराने रक्कम वर्ग केली आहे. त्या बँकेशी संपर्क साधून तात्काळ संबंधित खाते गोठवण्यात आल्याने ४० लाख ४३ हजार ४४ हजार ४५६ रुपये वाचले आहेत. मात्र ही रक्कम मिळवणे ही न्यायालयीन प्रक्रिया आहे. समाज माध्यमातून बदनामी करणे, अश्लील फोटो टाकणे अशा ४२ तक्रारी आल्या असून त्यात २५ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे.

बचावाचे पाच सोपे नियम सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी सांगितले की सायबर फसवणुकीपासून बचावाचे पाच अगदी सोपे नियम आहेत.

हे नियम असे -

कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी सोशल मिडीयाच्या माध्यमातून चॅटींग करू नये.

अनोळखी व्यक्तीने सोशल मिडीयाद्वारे सांगितलेले, गुंतवणूक योजना, पैसे वाढविण्याच्या स्कीम्स, विविध रिवार्ड पॉईंट्स कूपन्स अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये.

व्हॉटसॲप किंवा ई- मेलद्वारे आलेले डॉट ए.पी.के फाईल किंवा लिंक वर क्लिक करून डाउनलोड करू नये.

कोणतेही अनोळखी ?प मोबाईल मध्ये डाउनलोड करून नये.

कोणाताही ओ.टी.पी, पासवर्ड कोणालाच शेअर करू नये.

नवी मुंबईत ११ महिन्यांत ऑनलाइन फसवणुकीचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

एकतर्फी प्रेमातून तिहेरी हत्याकांड; आरोपीला तिहेरी जन्मठेप

छ.संभाजीनगर ■ प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पैठण तालुक्यातील जुने कासवन गावात एकतर्फी प्रेमातून चार वर्षांपूर्वी घरात घुसून एकाच कुटुंबातील आई, वडील व १० वर्षीय मुलीची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी आरोपी अक्षय प्रकाश जाधव (२७, रा. माळवाडी, ता. पैठण) याला तिहेरी जन्मठेपेसह एकूण ४० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश एन.एम. जमादार यांनी गुरुवारी सुनावली. आरोपीच्या दंडाची रक्कम मृतांच्या वारस मुलाला देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

संभाजी उर्फ राजू नारायण नेवारे (३५), त्यांची पत्नी अश्विनी (३०) व मुलगी सायली (१०) अशी मृतांची नावे आहेत. तर राजूचा मुलगा सोहम (६) हा या घटनेत जखमी झाला होता. मृत संभाजी यांच्या पुतणीवर आरोपी एकतर्फी प्रेम करीत होता. याबाबतची माहिती संभाजी यांना मिळाली होती. त्यामुळे आरोपी अक्षय जाधव व त्याच्या कुटुंबीयांना गाव सोडून दुसरीकडे राहण्यासाठी जावे लागले होते. यादरम्यान आरोपीचा भाऊ हा अचानक घरातून बेपत्ता झाला होता. यामागे संभाजी यांचा हात असल्याचा संशय अक्षयला होता. यादरम्यान २९ ऑगस्ट २०१९ रोजी मृताच्या पुतणीने दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय जाधव याच्याविरोधात बलात्कार आणि अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी या गुन्ह्यात जामिनावर असताना २७ नोव्हेंबर २०२० रोजी मृताच्या पुतणीचा पाठलाग केला होता. यावरून मृत संभाजी व आरोपी अक्षय जाधव यांच्यात वाद झाला. त्यानंतर आरोपीने त्याला तुला आता सोडणार नाही अशी धमकी दिली होती. त्याच रात्री अक्षयने संभाजी, त्यांची पत्नी व दहा वर्षांच्या मुलीचा निर्घृणपणे खून केला होता. तर सोहम हा मुलगा बचावला. या प्रकरणात मृत संभाजी नेवारे यांचे भाऊ उर्फ पांडुरंग निवारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खटल्याच्या सुनावणीवेळी सहायक लोकाभियोक्ता सुदेश शिरसाठ आणि मधुकर आहेर यांनी २६ साक्षीदारांचे जबाब नोंदवले. ॲड. शिरसाठ यांना ?ड. तेजस्विनी मोने आणि ॲड. दिलीप खंडागळे यांनी सहाय्य केले तर पैरवी अधिकारी म्हणून हवालदार गुणावत यांनी काम पाहिले.

स्वर्गवासी विनायकराव शेळके पाटील स्मृती चषक २०२४ चा बक्षीस वितरण समारंभ संपन्न

खंडाळा ■ पांडूरंग कुंभार



खंडाळा : स्वर्गवासी विनायकराव शेळके पाटील स्मृती चषक वितरण समारंभ कार्यक्रम अनेक मान्यवरांच्या उपस्थित लोणंद येथे संपन्न झाला या बक्षीस वितरणात प्रथम बक्षीस आहीरेश्वर क्रिकेट क्लब आहे रे तालुका खंडाळा दुतीय क्रमांक एम एस क्रिकेट क्लब येरवडा तृतीय क्रमांक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले क्रिकेट क्लब नायगाव आणि मॅन ऑफ द मॅच सिरीज अभी धायगुडे यांनी पटकावला स्वर्गवासी विनायकराव शेळके पाटील स्मृती चषक ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष लोणंद नगरपंचायतीचे माजी नगरसेवक हनुमंतराव शेळके पाटील यांच्या अथक प्रयत्नातून व देणगीदारांच्या सहकार्यातून एवढे मोठे क्रिकेट सामने भरवले जातात त्यामुळे देणगीदारांचे मनापासून अभिनंदन करतो तसेच या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद माजी कृषी सभापती मनोज पवार यांनी मनोगत व्यक्त केले की लोणंद शहरामध्ये युवा खेळाडूसाठी भव्य क्रीडा संकुल उभारून मिळावे व लोणंद मधील खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांच्या कलागुणांचा सत्कार करून त्यांचं नाव महाराष्ट्र व देशभर जावो ही सर्व खेळाडूंना शुभेच्छा तसेच स्वर्गवासी विनायकराव शेळके पाटील ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष हनुमंतराव शेळके पाटील व सर्व देणगीदारांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे तसेच लोणंद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशील भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगित सामने खेळताना छोटे-मोठे वाद विवाद होतात परंतु त्या वादविवादातून टोकाची भूमिका न घेता आपला सामना कसा चांगला खेळता येईल याच्याकडे लक्ष दिले पाहिजे भोसले साहेबांनी स्वतःचे उदाहरण देऊन सांगितले की मीही खेळताना कुठेही वाद-विवाद न करता कुठलीही प्रॅक्टिस न करता कुठल्याही अॅकडमीमध्ये न जाता मला दोनशे पैकी १८६ गुण मिळाले होते मी जर कुठे वाद करत बसलो असतो तर आज मी इथे दिसलं नसतो असे सुंदर उदाहरन सांगून साहेबांनी स्पर्धा अतिशय उत्कृष्ट पद्धतीने झाल्या व येथून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लोणंदनगरीच्या नगराध्यक्ष सीमाताई वैभव खरात तसेच या बक्षीस वितरण समारंभासाठी लोणंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुशील भोसले जिल्हा परिषद माजी कृषी सभापती मनोज पवार लोणंद बाजार समितीचे सभापती सुनील शेळके पाटील उपनगराध्यक्ष रवींद्र शिरसागर नगरसेवक शिवाजीराव शेळके पाटील वैभव उर्फ बंटी खरात गरज शेळके साहेब मकरंद डोंबाळे गणेश शेळके ओमकार शेळके निखिल खरात रमेश शेळके पाटील सैलजा खरात सागर शेळके व बहुसंख्येने नागरिक व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र मुसळे यांनी केले.

वरठाण येथील शाळेत केंद्र स्तरीय शिक्षण परीषद संपन्न

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगावः तालुक्यातील वरठाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आले होते

. सदर शिक्षण परिषदेत अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय गुळवे गावचे सरपंच अनिल सोळके तसेच प्रतिष्ठित नागरिक नंदूबापू सोळके उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून बनोटी केंद्रप्रमुख नितीन राजपूत व व्यासपिठावर प्रभारी केंद्रीय मुख्याध्यापक अनिल वाणी वरठाण शाळांचे मुख्याध्यापक नागोराव काकडे,श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था सोयगाव चे चेअरमन शकूर शेख व्यासपीठावर उपस्थित होते. आलेल्या मान्यवराचे स्वागत करण्यात आले नंतर शाळेच्या विद्यार्थ्यांकडून स्वागत गीत गाऊन झाले. मान्यवराच्या हस्ते सरस्वती माता व संत शिरोमणी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. नंदूबापू सोळके यांनी जिल्हा परिषद शाळा व इंग्रजी माध्यमांच्या शाळा यातील वाढता कल याबद्दल वास्तविकता सांगितली. तर सरपंच अनिल सोळंके यांनी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी हे इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा कसे सकस आहे व समाजात पालकांचे मानसिकता याबद्दल मार्गदर्शन केले. गोविंदनगर शाळेचे सहाय्यक शिक्षक श्री दीपक नगरे यांनी शाळेमध्ये राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमाबद्दल विस्तृत विवेचन केले. तर विशेष शिक्षक श्री लांडगे यांनी दिव्यांग विद्यार्थांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व मदत निधी या बद्दल माहिती दिली. केंद्रप्रमुख नितीन राजपूत यांनी शिक्षणाची दशसूत्री व माननीय जिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्या सूचना शालेय शिक्षणात कशा पद्धतीने आपण राबवू शकतो हे सखोल मार्गदर्शन केले. सोबतच अपार ग्, अध्ययन स्तर निश्चिती, निपुण भारत अभियान अंतर्गत माता पालक गटाचे महत्व, टारगेट पीक ?प चा वापर, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मार्गदर्शन करणे, शाळांमध्ये पालक,विद्यार्थी व शिक्षक यांच्यात सहसंबंध निर्माण करणे, नाविन्यपूर्ण उपक्रम व शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती निर्माण करणे अशा अनेक मुद्द्यावर विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चौधरी यांनी केले प्रस्ताविक जीवन अजमेरे तर आभार दीपक मोहितकर यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी ते साठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य , सरपंच शाळेचे मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षक धर्मराज सोनार यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाच्या शेवट राष्ट्रगीताने झाला.

पळाशी येथील विहीरीत पडलेल्या कोल्ह्यास दीले जीवदान



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगावः सद्या पळाशीसह परीसरात कोल्हा,लाडंगे,तडस याचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव वाढला असुन एक कोल्हा विहीरीत पडला विहीरीत पडलेल्या कोल्ह्यास वनकर्मचारी व सर्पमित्र याच्या मदतीने विहीरीतुन काढून जंगलात सोडले ....

पळाशी येथील शेतकरी विठ्ठल बाबुराव जाधव गट न २८९ मधील शेतातील विहीरीत एक कोल्हा पडल्याची माहिती रोषण चव्हाण यांनी वनविभागाला दीली त्यानुसार वनसंरक्षक वनरक्षक नितीन सोनवणे व नितेश मुलताने सोबत सर्पमित्र संदीप चव्हाण, रवी राठोड,मोहन चौधरी यांनी विहिरीतून कोल्हास सुखरूप बाहेर काढून निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केले.

विठाई स्नॅक्स सेंटर उद्योजक अजित जगताप युवा उद्योजक पुरस्काराने सन्मानित

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : रांजणगाव गणपती. ता. शिरूर येथील अजित जगताप यांनी आपल्या स्नॅक्स व्यवसायाच्या माध्यमातून खाद्य पदार्थ व्यावसायिक म्हणून औद्यागिक व तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या रांजणगाव गणपती गावचे नाव आपल्या खाद्यपदार्थ व्यवसायाच्या माध्यमातून परीसरात वाढविल्यामुळे यांना साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी या धडाडीच्या वृत्तपत्राच्या वतीने दिला जाणारा यशस्वी उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शिरूर तालुक्यातील रांजणगाव गणपती. ता. शिरूर येथील भूमीपुत्र श्री.अजित अनिल जगताप यांनी सन २०२१ मध्ये तीन वर्षांपासून पुणे-नगर हायवेवरती रांजणगाव औद्यागिक वसाहती समोर हॉटेल जय मल्हार शेजारी विठाई स्नॅक्स ची स्थापना केली.ग्राहकांना महाराष्ट्रीयन व साऊथ इंडियन पध्दतीचे रुचकर खाद्यपदार्थ प्रामाणिकपणे देऊन आपल्या स्नॅक्स सेंटरचे नाव प्रसिध्द केले आहे. त्यांनी व्यवसायिक क्षेत्रात उच्च शिक्षण घेतले असून ते कष्ट, प्रामाणिकपणा, गुणवत्ता व सचोटीच्या माध्यमातून आपल्या विठाई स्नॅक्स सेंटर याठिकाणी ग्राहकांना आवडेल अशा पध्दतीचे रुचकर व चविष्ट पदार्थ देऊन त्यांनी प्रमाणिकपणे सेवा करून ग्राहकांची मने जिंकून घेतली आहेत.

यशस्वी उद्योजकाची प्रगतीकडे वाटचाल या माध्यमातून युवा उद्योजक श्री.अजित जगताप यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी शिरुर तालुका यशस्वी उद्योजक पुरस्कार देऊन रांजणगाव देवस्थान हॉल येथे २५ डिसेंबर २०२५ रोजी तृप्तीताई देसाई, संदीप दौंडकर, डॉ.ओंकार देव, विवेकानंद फंड, आनंदराव बारवकर संपादक,धनंजय गायकवाड व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र,शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

विठाई स्नॅक्स सेंटरचे मालक श्री.अजित जगताप यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

महिलांना शेतजमीन व अधिकार वाढवणे या विषयांवर मार्गदर्शन



आंबेगाव ■ संतोष गावडे

आंबेगाव : महिला आर्थिक विकास महामंडळ पुणे (महाराष्ट्र शासन)अंतर्गत जिज्ञासा लोकसंचलित साधन केंद्र मंचर येथे माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन(स्मार्ट) प्रकल्पा अंतर्गत महिलांचा शेतजमीन अधिकार वाढविणे या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी डॉ. सचिन वाघ नायब तहसीलदार आंबेगाव तसेच ?ड. विकास चांगण यांनी महिलांचे कायदे व हिंदू / मुस्लीम वारसा कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अशोक चव्हाण डी.सी.ओ माविम पुणे,आशिष दगडे डी.पी.सी माविम पुणे, जिज्ञासा स्मि व्यवस्थापक मनिषा जारकड, लेखापाल संदेश पवार, उपजीविका सल्लागार रजनी मिरके,सहयोगिनी,सर्व भेज सी.आर.पी.कार्यकारिणी, बचत गटातील सदस्य महिला,माविम मित्र मंडळातील पुरुष सदस्य उपस्थित होते.

श्री क्षेत्र वेळेश्वर गडावर छत्रपती शिवाजी महाराज यांची 'हिंदवी स्वराज्याची शपथ' शिल्पाचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

आंबेगाव ■ संतोष गावडे



आंबेगाव : आंबेगाव तालुक्याच्या सातगाव पठार भागातील वेळेश्वर गडावर छत्रपती शिवाजी महाराज यांची हिंदवी स्वराज्याची शपथ हे भव्य दिव्य शिल्प साकारले जाणार आहे या शिल्पाचे भूमिपूजन दि.२७ रोजी सकाळी १० वा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले.स्वराज्य संघ महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून नियोजित हे शिल्प साकारले जाणार आहे या शिल्पामध्ये छत्रपती शिवाजी महाराज रायरेश्वर शिवलिंग महाराजांच्या सोबत असलेले दहा मावळे,दोन अंगरक्षक व पुरोहित असं आणि बरंच काही वेगळं आगळ या शिल्पाचे स्वरूप असणार आहे.

भाजप नेते संजय भाऊ थोरात म्हणाले की,येणाऱ्या पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनाची वाटचाल केली पाहिजे कधीच कोणती अडचण तुम्हाला येणार नाही छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवचरित्र आपण वाचले पाहिजे डोळ्यासमोर छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श ठेवून काम करा मग कोणतंही क्षेत्र असो यामध्ये तुम्हाला नक्कीच यश मिळेल माझ्यासाठी आजचा हा भाग्याचा क्षण आहे की या शिल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमाला मला बोलावलं त्याबद्दल मी ह.भ.प नामदेव महाराज वाळके व ह.भ.प बाजीराव महाराज बांगर तसेच सर्व वारकरी संप्रदायातील महाराजांचं मनापासून आभारी आहे.यावेळी ह.भ.प माणिक महाराज मोरे,ह.भ.प राम नाना मोरे,ह.भ.प नामदेव महाराज वाळके,ह.भ.प बाजीराव महाराज बांगर,भाजप नेते संजय थोरात,भानुदास काळे,बाळासाहेब दिघे,शामकांत निघोट,माऊली एरंडे,दिलीप पवळे संजय कराळे रामदास ढवळे,सुनील कातोळे,रमेश शेठ काळे व सातगाव पठार वरील मान्यवर,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना दिलीप पवळे यांनी केली,सूत्रसंचालन प्रा.अंकुश कराळे व आभार संजय कराळे यांनी मानले.

औंध येथे जिल्हा स्तरीय क्रिडा स्पर्धचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न



औंध ■ महेश यादव

महाराष्ट्र शासन इतर मागास बहुजन कल्याण विभाग सातारा व शिवगर्जना प्रतिष्ठान संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा व संभाजीराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय औंध यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सहसंचालक इतर मागासवर्गीय बघूनच कल्याण विभागामार्फत सौभाग्यवती कांचन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली औंध येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन कार्यक्रम पार पडला कार्यक्रमास आणून पोलीस स्टेशनचे ए.पी.आय श्री अविनाश मते साहेब, खटाव गटशिक्षणाधिकारी सौ विभुते मॅडम, शिवगर्जना प्रतिष्ठान औंध चे चेअरमन श्री राजाभाऊ देशमुख, विस्तार अधिकारी खटाव श्री सुतार साहेब, पीएसआय चौधरी साहेब, केंद्रप्रमुख श्री पाटोळे साहेब श्री जयसिंगराव घाडगे अध्यक्ष माजी अध्यक्ष,सैनिक संघटना मेजर वसंत पवार, माझी ग्रामपंचायत सदस्य, श्री बाबा गोसावी, श्री अर्जुन यादव, श्री गणेश चव्हाण, श्री संदीप इंगळे,श्री मंगेश इंगळे,श्री जयवंत देशमुख, श्री प्रभाकर गाडगे, श्री धर्मराज शिंदे,श्री कुंदन चव्हाण सर्व जिल्ह्यातून आलेल्या शाळांचे सर्व आश्रम शाळेचे प्रमुख मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांना परवानगी नसलेल्या हॉटेल मध्ये मद्यपान करणे भोवल

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील

काटे पिंपळगाव येथील हॉटेल चालकासह आठ व्यक्तीवर गुन्हा दाखल;राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



गंगापूरः परवानगी नसलेल्या हॉटेल मध्ये मद्यपान करण्यासाठी गेलेल्या काटे पिंपळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापक व कर्मचारी हॉटेल मालकासह ८ मद्यसेवन करणा-या मद्यपीवर राज्य उत्पादन शुल्क, ड विभागाने धाड टाकून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६८ व ८४ अन्वये कारवाई करुन गुन्हा दाखल केला आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप आयुक्त संगीता दरेकर, अधीक्षक संतोष झगडे, उपअधीक्षक गुनाजी क्षीरसागर, यांच्या मार्गदर्शनाखाली नविन वर्षाच्या पार्श्वभुमीवर विशेष मोहीमेतील पथकाने २७ डिसेंबर रोजी निरीक्षक अजय टी बगाटे , राज्य उत्पादन शुल्क, ड विभाग यांच्या नेतृत्वाखाली राज्य उत्पादन शुल्क विभाग छत्रपती संभाजीनगर यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने गंगापूर तालुक्यातील काटे पिंपळगाव शिवारात हॉटेल सहयाद्री, काटेपिंपळगाव शिवार येथे छापा मारला असता हॉटेल चालक रामेश्वर मुरलीधर जगताप, वय-२६ वर्ष, रा. काटेपिंपळगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर हा इसम त्याच्या हॉटेल मध्ये ग्राहकांना मद्यसेवन करिता लागणाऱ्या सर्व सोयी-सुविधा पुरवित असतांना मिळून आला. तसेच सदर हॉटेल सहयाद्री मध्ये एकूण ०७ इसम मद्य प्राशन करतांना मिळून आल्याने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर कारवाईत १. ज्ञानेश्वर विनायक कोल्हे, वय ४८ वर्ष रा. पालखेड, ता. वैजापुर, जि.छ. संभाजीनगर.(बँक कर्मचारी जिल्हा मध्यवर्ती बँक)२. चंद्रकांत रामभाउ जाधव, वय- ५१ वर्ष, रा. पालखेड, ता. वैजापुर, जि.छ. संभाजीनगर.(जिल्हा बँक मध्यवर्ती कर्मचारी काटे पिंपळगाव)३. आबासाहेब दयाराम तांबे, वय ५३ वर्ष, रा. खिर्डी, पो. जळगाव, ता. वैजापुर, जि. छ. संभाजीनगर.((बँक मॅनेजर जिल्हा मध्यवर्ती काटे पिंपळगाव)४. ज्ञानेश्वर एकनाथ मोकाटे, वय- ५० वर्ष, रा. पालखेड, ता. वैजापुर, जि. छ. संभाजीनगर.(बँक कॅशियर जिल्हा मध्यवर्ती काटे पिंपळगाव)५. भानुदास एकनाथ जगदाळे, वय- ४९ वर्ष, रा. पालखेड, ता. वैजापुर, जि.छ. संभाजीनगर,(बँक कर्मचारी) ६. जाधव रावसाहेब त्रिंबक, वय- ४३ वर्ष, रा. काटेपिंपळगाव, ता. गंगापुर, जि. छ. संभाजीनगर.(खरेदी विक्री संघ कर्मचारी गंगापूर) ७. रामनाथ एकनाथ धोत्रे, वय ५६ वर्ष, रा. काटेपिंपळगाव, ता. गंगापुर, जि.छ. संभाजीनगर. या ७ इसमांवर कारवाई करण्यात आली असून या कारवाईत देशी, विदेशी मद्य व इतर साहीत्यसह रु ३८ हजार ९५५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क, ड विभागाचे निरीक्षक अजय टी बगाटे, दुय्यम निरीक्षक गणेश उंडे, शिवाजी नजन, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश नागवे, जवान- योगेश घुनावत, विजय पवार, बाबासाहेब कर्पे व रामदास लांडे तसेच जवान-नि-वाहन चालक किसन सुंदडें यांच्या पथकाने केली.

निरीक्षक अजय बगाटे 'नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कुठल्याही अवैध ढाब्यावर किंवा अवैध ठिकाणी दारु पितांना आढळून आल्यास ढाबा मालकासह मद्यसेवन करणा-या इसमा विरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल'.

वरठाण येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगाव : सोयगाव तालुक्यातील वरठाण येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली...

सालाबादप्रमाणे या वर्षीही तेली समाजाच्या वतीने श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराजांची प्रतिमा पालखीमध्ये ठेवुन प्रथम पुजन सुभाष चौधरी यांनी केले टाळ मृदंग भजन गायन करीत मोठ्या भक्तिभावाने गावभर पालखी सोहळा निघाला नंतर महाप्रसाद लाभ ग्रामस्थांनी घेतला यावेळी तुळशीराम चौधरी, सुरेश चौधरी, राजेंद्र चौधरी,दीलीप चौधरी,धनराज चौधरी, रविंद्र चौधरी,उत्तम चौधरी, अशोक चौधरी, कैलास चौधरी, तसेच श्री कृष्ण भजनी मंडळाचे अभिमान महाजन,निंबा भोजणे,राजु भोजणे, भिकन सोळंके,आदेश सोळंके, सुदर्शन महाराज, राजेंद्र सोळंके, साहेबराव सोळंके, गोविंद सोळंके,जितेंद्र महाजन,बाळु तायडे,गणसिंग खंडाळे, बाळु खंडाळे,वाल्मीक भोई, राजेंद्र भावसार, नामदेव सुर्यवंशी,रघुनाथ जाधव, विकास महाले,गोपाल बैरागी,नाना मास्तर आदी ग्रामस्थ उपस्थित होते ह्या कार्यक्रमासाठी नवतरुण मित्र मंडळ व ग्रामस्थांनी अनमोल सहकार्य केले.

कराड सैदापूर येथील एका कुटुंबावर गोळीबाराचा थरार; वडिलांसह मुलगी गंभीर जखमी

कराड ■ कुलदिप मोहिते



कराड : सैदापूर येथील होली फॅमिली स्कूलमागे असलेल्या सोसायटीमध्ये शुक्रवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास एकाने कुटुंबावर गोळीबार केला. त्यामध्ये वडिलांसह दहा वर्षाची मुलगी गंभीर जखमी झाली. त्यानंतर हल्लेखोराने स्वतःला कोंडून घेतले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्याने पोलिसांवरही हल्ल्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मोठा गोंधळ उडाला. अखेर पोलिसांनी सावधगिरी बाळगत शिताफिने हल्लेखोराला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गावठी पिस्तुलासह १६ जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आली आहेत.

प्रदीप शंकर घोलप व श्राव्या शंकर घोलप अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी हल्लेखोर सुरेश काळे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सैदापूर येथे होली फॅमिली स्कूलमागे ओम कॉलनीमध्ये अक्षरा गृहनिर्माण सोसायटी आहे. या सोसायटीत २० फ्लॅट असून प्रदीप घोलप हे सोसायटीचे अध्यक्ष आहेत. त्याच इमारतीत पहिल्या मजल्यावर सुरेश काळे हा कुटुंबासह राहण्यास आहे. शुक्रवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास प्रदीप घोलप हे सोसायटीच्या पार्किंगमध्ये आले. त्यावेळी सुरेश काळे याने दुचाकी वाटेतच लावल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी सुरेश काळे याला दुचाकी व्यवस्थित बाजूला लावण्यास सांगितले. त्यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्यानंतर प्रदीप घोलप आपल्या फ्लॅटमध्ये गेले. कुटुंबासह ते जेवण करीत असताना बेल वाजल्यामुळे प्रदीप यांनी दरवाजा उघडला. त्यावेळी सुरेश काळे दरवाज्यात उभा होता. मला तुमच्याशी बोलायचे आहे, असे म्हणून तो घरात घुसला. प्रदीप यांनी त्याला बसायला सांगितले. मात्र, अचानक त्याने स्वतःजवळील पिस्तूल काढून गोळीबार सुरू केला. त्यामध्ये प्रदीप घोलप व त्यांची मुलगी श्राव्या घोलप हे दोघेजण जखमी झाले.

घटनेनंतर आरडाओरडा झाल्यामुळे नागरिकांनी त्याठिकाणी धाव घेतली. त्याचवेळी सुरेश काळे त्याच्या फ्लॅटमध्ये गेला. त्याने त्याच्या कुटुंबासह स्वतःला आतमध्ये कोंडून घेतले. काही वेळातच पोलीस उपअधीक्षक अमोल ठाकूर, पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहाय्यक निरीक्षक राजेश माळी, उपनिरीक्षक निखिल मगदूम, हवालदार सागर बर्गे यांच्यासह पोलीस त्याठिकाणी पोहोचले. त्यांच्यासह नागरिकांनी जखमी प्रदीप घोलप व त्यांच्या मुलीला उपचारार्थ रुग्णालयात हलवले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर मात्र संशयताने स्वतःला घरात कोंडून घेतले त्याच्यासोबत त्याचे कुटुंबीय सुद्धा होते पोलिसांनी त्याला दरवाजा उघडण्याची विनंती केली असता संशयिताने पोलिसांवर सुद्धा हल्ला करण्याचा प्रयत्न केला पोलिसांनी त्याच ताब्यात घेतल्यानंतर घराची झडती घेतली असता एका धान्याच्या डब्या खाली लपवून ठेवलेली पिस्तूल व १६ जिवंत काडतुसे असे पोलिसांना मिळून आली ती पोलिसांनी जप्त केली आहेत

थिटे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना फेलोशीप

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



शिरूर : श्री. छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि बापूसाहेब थिटे कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परिमल अँड प्रमोद चौधरी फाउंडेशन (झ्झण्ड) आणि ओपाश सोसिओ. कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने फेलोशीप देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी पी.पी.सी.एफ. मार्फत उपस्थित असलेल्या सौ. सुजाता गोहड आणि श्री. बाबू भंडारे या मान्यवरांचे सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान सौ. सुजाता मॅडम यांनी विद्यार्थ्यांना फेलोशीप देण्यामागील मुख्य उद्दिष्टे आणि त्याबाबतची प्रक्रिया सविस्तरपणे सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा सरांनी सुद्धा फेलोशीपचे महत्व तसेच या विद्यार्थ्यांनी भविष्यामध्ये इतर गरीब कुटुंबातील गुणवंत मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आर्थिक मदत करावी आणि समाजासमोर एक आदर्श व्यक्ती बनावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तसेच काही विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

डी. फार्मसीचे कु. कृतिका गलांडे, कु. तुषार धाडगे, कु. श्रद्धा इचके, कु. बहिरट अमृता तसेच जी. एन. एम. नर्सिंगच्या कु. पायल गाडे, कु. कावेरी अरेकर, कु. सानिका दरेकर, कु. शिवानी झालटे अशा ८ विद्यार्थ्यांना एकूण रक्कम ५,०६,०५८ फेलोशीप स्वरूपात प्राप्त झाली. या कार्यक्रमासाठी पी.पी.सी.एफ. च्या सौ. सुजाता गोहड आणि श्री. बाबू भंडारे, डि. फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल शहा आणि नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शीतल बर्डे, प्रो. मानसी गरदरे, पालक आणि विद्यार्थीही उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रजी थिटे, सचिव श्री. धनंजय थिटे, डॉ. हर्षवर्धन थिटे आणि डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी फेलोशिप दिल्याबद्दल पी. पी. सी. एफचे आभार मानले व फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

पसरणी ग्रामपंचायतीत जिल्हापरिषदेचे अनेक उपक्रम राबवणार : श्रीमती प्रज्ञा माने भोसले

पसरणीत जिल्ह्यातील पहिल्या इलेक्ट्रिक घंटागाडीचा लोकार्पण सोहळा संपन्न

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : पसरणी गावात आज जिल्ह्यातील पहिल्या विद्युत पुरवठ्यावर चालणाऱ्या ४ चाकी घंटा गाडीचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. आपल्या गावचा नावलौकिक करणारा सोहळा पाहण्यासाठी पसरणीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदुषण इंधन बचत मेन्टेनन्स यासारख्या अनेक गोष्टींचा विचार करून गावाला आधुनिक जगाशी जोडणारा एक धाडसी निर्णय घेतल्याबद्दल ग्रामपंचायत पसरणी यांचे तोंडभरून कौतुक सातारा जिल्हापरिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी सौ प्रज्ञा माने भोसले यांनी केले. पसरणी गावच्या विद्यमान सरपंच सौ हेमलता अशोकराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मागील काही वर्षांत पसरणी गावातील अनेक ज्वलंत प्रश्न मार्गी लागले आहेत. रस्ते गटार पाणी व्यवस्थापन लाईट सुविधा या सारख्या मुलभूत प्रश्नांना वाचा फोडत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात त्यांना मोठे यश आले आहे. या सर्व गोष्टी मार्गी लावण्यात ग्रामपंचायत मधील सर्व सदस्य यांचा त्यांना पाठिंबा असतो. माजी उपसरपंच श्री विशाल शिर्के यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

आपल्या प्रास्ताविकामध्ये मूलभूत प्रश्नांबरोबर गावचं नाव लौकिक करणाऱ्या विविध योजना गावांमध्ये राबविण्याचे प्रयोग आम्ही सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावातील जेष्ठ मंडळींना सोबत घेऊन राबवणार असे विचार युवा नेते स्वप्निल भाई गायकवाड यांनी मांडले. दोन पद्मश्रींचे गाव म्हणून पसरणीची ओळख साऱ्या जगात आहे या पद्मश्रींच्या नावाचा लौकिक वाढवण्याचे काम आजची पंचायत बॉडी फार जबाबदारीने करत आहे व त्यांना आमची साथ कायम राहील अशी माहिती वाई सुतगिरणीचे व्हाईस चेअरमन धर्माजी शिर्के बापू यांनी दिली. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग सौ प्रज्ञा माने भोसले, सरपंच सौ हेमलता अशोकराव गायकवाड पंचायत समिती सदस्य सौ सुनिता कांबळे, उपसरपंच श्री बद्रीनाथ महांगडे माजी उपसरपंच विशाल शिर्के, सदस्य श्री गेनू हरकळ श्री आनंदा येवले, श्री राहुल गायकवाड, सौ शारदा महांगडे, सौ अनिता महांगडे, सौ रूपाली शिर्के, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री बाळासाहेब जाधव विस्तार अधिकारी श्री राहुल हजारे बांधकाम अभियंता श्री मनोज पवार पाणीपुरवठा अभियंता श्री प्रमोद भोई, कुसगावच्या विद्यमान सरपंच सौ सीमा वरे व्याळी बोरीच्या सरपंच सौ सुजाता कांबळे, श्री अजय मांढरे, श्री राजेन्द्र येवले, श्री बाळासाहेब शिर्के व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नेटके नियोजन माजी पंचायत समिती सदस्य श्री राजेश शिंदे अमोल महांगडे दत्तात्रेय महांगडे आदी मान्यवर ग्रामस्थांनी केले. ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी श्री रामदास निंबाळकर यांच्यासह मनोज मांढरे उत्तम गाढवे चंद्रकांत महांगडे निकिता दुधाने वैभव महांगडे काजल गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

विनायक दाते युवा उद्योजक पुरस्काराने सन्मानित

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी यांच्यावतीने शिरूर तालुक्यातील यशस्वी युवा उद्योजक व युवा उद्योजिका क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले . यावेळी विनायक बबन दाते यांना युवा उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .

शेतकरी कुटुंबातील असून यांनी शेतीकामा बरोबरच काही काळ पोल्ट्री व्यवसाय सांभाळला आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर काही वर्ष रांजणगाव औद्योगिक वसाहतीत काम केले. नोकरदार रहाण्यापेक्षा मालक होऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचे ठरवले. त्यानी विनायक सेल्स कार्पोरेशन नावानेच स्वतःच्या व्यवसायाची सुरुवात करून एशियन, शालिमार, नेरोलेक, बर्जर असे विविध कलर ग्रामीण भागात उपलब्ध करून दिले. तसेच बिर्ला, जेके, आंबुजा अशा विविध प्रकारच्या सिमेंटची विक्रीस सुरुवात केली. सद्य परिस्थितीत त्यांच्या दुकानात सर्व बांधकाम साहित्य एकाच छताखाली उपलब्ध करून दिले आहे. विनायक दाते यांच्या याच कार्याची दखल घेऊन साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी यांच्यावतीने दिला जाणाऱ्या युवा उद्योजक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी मा. तृप्ती देसाई संस्थापक अध्यक्षा भूमाता ब्रिगेड, संदीप दौंडकर उपाध्यक्ष रांजणगाव देवस्थान ट्रस्ट, आनंदा बारवकर संपादक महाराष्ट्राची भूमी, विवेकानंद फंड सहसचिव द युवा ग्रामीण पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य, ओमकार देव मुख्य विश्वस्त रांजणगाव देवस्थान ट्रस्ट, मंगलताई सासवडे भूमाता ब्रिगेड शिरूर अध्यक्षा, धनंजय गायकवाड अखिल भारतीय ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य प्रांताध्यक्ष, डी.डि. बारवकर भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुणे जिल्हा सरचिटणीस, तात्यासाहेब सोनवणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष, शकील मनियार पुणे जिल्हा अध्यक्ष द युवा ग्रामीण पत्रकार संघटना, विठ्ठल होले कार्यकारी संपादक, विजय कांबळे शिरूर तालुका अध्यक्ष द युवा ग्रामीण पत्रकार संघटना, पत्रकार अल्लाउद्दीन आल्वी, तसेच महाराष्ट्राची भूमिचे सर्व पत्रकार व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रशस्तिपत्र, फेटा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन युवा उद्योजक विनायक दाते यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी शिरुर तालुक्यातील आदर्श उद्योजक, उद्योजिका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेकानंद फंड यांनी केले व आभार शकील मनियार यांनी मानले.

स्वयंसेवी संस्थेकडून शालेय उपयोगी वस्तूंची भेट

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : इनरवेल क्लब ऑफ पुणे रिव्हर रिदमस या स्वयंसेवी संस्थेतर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथे शालेय उपयोगी वस्तूंची भेट देण्यात आली. तसेच नुकतेच विद्यार्थ्यांना गरम कपड्यांचे वाटप करण्यात आले.

भेट देण्यात आलेल्या साहित्यात दोन सिलिंग फॅन, स्मार्ट टीव्ही, मुलांना ट्रॅक सुट, खुर्च्या, शूजस्टॅन्ड, मुलांना स्वेटर, कानटोपी, टेबल, कपाट, खेळाचे साहित्य आणि मुलांसाठी खाऊ आदींचा समावेश आहे. संस्थेच्या अध्यक्षा निकिता मित्तल, सचिव दिप्ती सरोगी, प्रियंका गुप्ता, प्राची अगरवाल, ब्रिद्धी गुप्ता अतुल अग्रवाल, नागेश कड, जि. प. प्रा. शाळा आगळंबेचे शिक्षण सत्तार तांबोळी, जि. प. प्रा. शाळा ठाकरवाडीच्या प्रभारी मुख्याध्यापिका मनीषा बुंदे, सहशिक्षिका देवश्री रेपाल, ठाकरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास पायगुडे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जि. प. प्रा. शाळा आगंळबेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र हिलाळ यांनी भुषविले. निकीता मित्तल, नागेश कड, सत्तार तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. देवश्री रेपाल यांनी सुत्रसंचालन केले. मनीषा बुंदे यांनी आभार मानले.

चौथीत शिकणाऱ्या मुलीने केली मदत

ब्रिद्धी गुप्ता या चौथीत शिकणाऱ्या मुलीने दिवाळीत स्वतः पणत्यांची डिझाईन करून विक्री केली होती. त्यातून मिळालेल्या पैशातून या मुलींने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी (ता. हवेली) या शाळेतील १८ विद्यार्थ्यांना स्वेटर व कानटोपी भेट दिली. ब्रिद्धी गेल्या काही वर्षांपासून दिवाळीत पणत्या विकते. त्यातून मिळालेल्या पैशातून ती सामाजिक कार्य करते, असे तिच्या पालकांनी सांगितले.

डी. व्ही. गायकवाड राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित

खंडाळा ■ हेमंत धायगुडे



खंडाळा : येथील सातारा जिल्ह्यातील आदर्श शाळा लोहम फाटा, जवळेचे उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक डी. व्ही. गायकवाड यांना 'सकाळ समूह माध्यम, न्युज पेपर इन एज्युकेशन व एम टेक इंजिनियर्स ग्रुप या राज्यस्तरीय समुहाच्यावतीने राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'असा साधला संवाद' या स्पर्धेत सादर केलेल्या 'एक प्रयत्न वन्यजीवांसाठी' उपक्रमास हा राज्यस्तरीय सकाळ समूह माध्यम राज्यातील शिक्षकांना उपक्रम दिशा देण्याचे उत्कृष्ट कार्य करीत आहे. त्यांनी केलेल्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची समूहातर्फे दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यामध्ये लोहम फाटा, जवळेचे (ता. खंडाळा) येथील पंचक्रोशी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक डी. व्ही. गायकवाड यांची उपक्रमशील शिक्षक या पुरस्कारासाठी निवड झाली. सदरचा पुरस्कार समारंभ ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, निगडी, पुणे या ठिकाणी पार पडला. याप्रसंगी पिंपरी चिंचवड मनपा सकाळ आवृत्तीचे सहयोगी संपादक जाधव, एम. टेक इंजिनीअर्सचे सर व्यवस्थापक नदीम शेख, पिंपरी चिंचवड शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी सविता बांगर, सकाळ माध्यम समूहाच्या संचालिका श्रीमती मृणाल पवार, समन्वयक श्री. विशाल सर, परीक्षक शिवराज पिंपुडे , पत्रकार व लेखक पितांबर लोहार आदींसह आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते. पुरस्कार प्राप्ती बद्दल खंडाळा विभाग शिक्षण समितीचे अध्यक्ष शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध गाढवे, सर्व संचालक व पदाधिकारी तसेच लोहोम पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

काँग्रेसचा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणारा सक्रिय कार्यकर्ते जे.के.पाटील यांचे दुःखद निधन

सातारा कराड ■ राहुल पवार



सातारा कराड: कराड तालुक्यातील.वडोली निळेश्वर गावचे माजी पोलीस पाटील राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष जोतीराम किसन पाटील दादा(जे.के.पाटील)यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी पहाटे दुःखद निधन झाले.त्यांनी भारतीय सैन्यदलात १७वर्षे देशसेवा केली.त्यानंतर एसटी महामंडळात सेवा केली.तसेच गावचे पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्षपदावर काम केले राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष होते सामाजिक कार्यामध्ये त्यांचा सहभाग होता.त्यांचे पश्चात ३मुले,१मुलगी,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचा रक्षा विसर्जन आणि दशक्रिया कार्यक्रम रविवार दि.२९/१२/२०२४रोजी सकाळी ९वाजता वडोली निळेश्वर येथे होणार आहे.

पी.जे.आणि आनंद लक्ष्मण चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालय वाडा येथे आई व्याख्यानकार कवी प्रशांत मोरे यांचे 'आई 'व्याख्यान आयोजित

पालघर ■ प्रा.मिलिंद खरात



पालघर: दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक कवी व आई व्याख्यानकार प्रशांत मोरे सर यांचे आई या विषयावर व्याख्यान पी. जे. हायस्कूल वाडा, व आनंद लक्ष्मण चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालयातील खुल्या रंगमंचावर निसर्गरम्य पहाटेच्या वातावरणात आयोजित करण्यात आले होते.

कवी प्रशांत मोरे हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक असून ते गीतकार व कवी सुद्धा आहेत. आंबेडकरी विचारवंत म्हणून ओळखले जातात. प्रशांत मोरे यांचे तीन कविता संग्रह प्रसिद्ध असून त्यांचा आई या विषयावरील कवितांचं पुस्तकही प्रसिद्ध झालेल आहे. कवी प्रशांत मोरे हे सर्वसामान्य माणसाच्या सुख दुःखावर, गरिबी, दारिद्र्य कुटुंब व्यवस्था यावर कविता लिहितात त्याच प्रमाणे ते त्यांच्या गोड व पहाडी आवाजात त्या सादरही करतात .त्यांच्या कविता या थेट माणसाच्या काळजाला घाव घालतात.

आजच्या कॉलेज व शाळेमधील मुलांना आपल्या आई-वडिलांचे महत्त्व, गुरुजनांचे महत्त्व काय आहे याची जाणीव व्हावी. तसेच शाळेतली व कॉलेज मधील तरुण-तरुणी आधुनिकतेच्या नावावर मोबाईल व सोशल मीडियाच्या जाळ्यात कसे ओढले गेले आहेत. त्यांना त्यांची ध्येय,उद्दिष्ट कसे प्राप्त करायचे. आपल्या मुलांसाठी आई-वडील कोणते त्याग करतात. याची जाणीव व्हावी हा उद्देश डोळ्या समोर ठेवून दि-वाडा को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी चे सर्व सन्माननीय संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व स्कूल कमिटी चेअरमन यांच्या परवानगी ने कॉलेजचे प्राचार्य श्री. हरिश्चंद्र जोगी सर, उपप्राचार्य श्री. गोस्वामी सर, पर्यवेक्षक श्री. तांबोळी सर , व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने मोरे सरांचे इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी साठी आई व्याख्यान आयोजित केले होते.

मोरे सरांनी आई वरील कविता सुंदर पहाडी व विदर्भ मराठवाड्याच्या वऱ्हाडी भाषेत गाऊन उपस्थित विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचे मन भरून आणून प्रत्येकाच्या डोळयात अश्रू उभे केले. प्रत्येकाला आपल्या डोळ्यासमोर आईच दिसली. त्याचप्रमाणे बाप या विषयावर ही सुंदर कविता त्यांनी सादर केल्या. तसेच कवी प्रशांत मोरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आई- वडील -गुरुजन आपल्या मुलां साठी कशा प्रकारे त्याग करतात. कोणत्या परिस्थितीत जीवन जगतात याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मुकणे सर यांनी केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. हरिश्चंद्र जोगी सर यांनी श्री. मोरे सरांची ओळख व जीवन परिचय करून दिला. या कार्यक्रमासाठी कार्यालय अधीक्षक श्री. खिरारी साहेब व डॉ.अँडोकेट. श्री सुनील भडांगे सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार श्री. सोनवणे सर यांनी सुंदर कविता सादर करून उपस्थित सर्व पाहुण्यांचे, व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे सुंदर अलंकारिक शब्दातआभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

सातऱ्यातील मंत्र्यांचा घटनाकार डॉ. आंबेडकर स्टॅच्यू व संविधान देऊन रमेश उबाळे यांनी केला सत्कार

कोरेगाव ■ अज्जु मुल्ला



कोरेगाव : सातारा दिः सातारा जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच चार कॅबिनेट मंत्रीपद देऊन व एक उपाध्यक्ष पद असा भर गच्च अनुशेष भरून काढला आहे. यानिमित्त कॅबिनेट मंत्री नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले व नामदार मकरंद पाटील यांना घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टॅच्यू व संविधानाची प्रत भेट देऊन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे यांनी सत्कार केला. या सत्कार सोहळ्याने मंत्री महोदय सुद्धा भारावून गेले.

सातारा जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीच्या प्रचारासाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व मागासवर्गीय वाड्या- वस्तीमध्ये जाऊन प्रचार केला. तसेच भविष्यात मागासवर्गीयांच्या वस्तीमध्ये विकास कामांसाठी पाठपुरावा करण्याचे अभिवचन दिले होते. त्यामुळे महायुतीला यश मिळाले आहे. अशा शब्दात मंत्रिमहोदयांनी श्री उबाळे यांचा गौरव केला आहे.

हा सत्कार म्हणजे खऱ्या अर्थाने मागासवर्गीय बांधवांनी टाकलेला विश्वास आहे. त्या विश्वासाला कदापि तडा जाऊ देणार नाही. राज्याच्या मंत्रिमंडळात काम करताना मागासवर्गीय योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे सहकार्य कायम स्मरणात राहणार आहे. लवकरच स्थानिक पातळीवर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या प्रामाणिक व होतकरू कार्यकर्त्यांना शासकीय कमिट्यावर संधी दिली जाईल. असे मंत्री महोदयांनी सांगितल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली आहे. तसेच पीपल रिपब्लिकन पार्टीच्या विस्तारासाठी ही महायुती विशेष प्रयत्न करेल. यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे असं श्री रमेश उबाळे यांनी नमूद केले. सत्कार सोहळ्याला सातारा शहर, कोरेगाव, वाई ,खंडाळा, कराड, महाबळेश्वर, पाटण, माण, खटाव, दहिवडी, फलटण, वडूज, पाचगणी, जावळी, सायगाव, आनेवाडी, मोरघर कुडाळ करहर केळघर, खेड, प्रतापसिंह नगर, शाहूपुरी, शाहूनगर, करंजे येथील पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी ३ जानेवारी पासून आंदोलन तीव्र होणार:कॉ. दिलीप उटाणे

वर्धा ■ प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियन आयटक वर्धा जिल्हा शाखा बैठक २२ डिसेंबर २०२४ रोजी आयटक कामगार केंद्र बोरगाव मेघे येथे जिल्हाध्यक्ष विजया पावडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली

या बैठकीला मार्गदर्शन करताना संघटनेचे राज्य अध्यक्ष कॉम्रेड दिलीप उटाणे यांनी ग्रॅज्युटी दरमहा पेन्शन, उच्च न्यायालय गुजरात, सर्वोच्च न्यायालय नई दिल्ली येथील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत देण्यात आलेले निर्णय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून वर्धा जिल्ह्यातील महिलांनी उपस्थित केलेल्या प्रलंबित प्रश्नाबाबत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिना पासून जिल्हा परिषद वर्धा समोर तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

राज्य सरकारने लाडके बहीण योजनेचे काम अंगणवाडी कर्मचाऱ्याकडून करून घेतले परंतु अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पन्नास रुपये प्रति फार्म प्रोत्साहन भत्ता अजून पर्यंत देण्यात आलेल्या नाहीङयाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली

प्रवास भत्ता-- राज्य सरकार सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी एकदाच प्रवास भत्ता निधी देते परंतु वर्धा जिल्ह्यात सेलू तालुक्या त २०१८ पासून तर हिंगणघाट प्रकल्पात मार्च २०१९ आर्वी मार्च २०२० समुद्रपूर जुलै २०२१ कारंजा फरवरी २०२२ तर वर्धा एक वर्धा प्रकल्प दोन फरवरी २०२४ पासून प्रवास भत्ता देण्यात आलेल्या नाही.

सीबीई कार्यक्रम निधी--

अंगणवाडीतील मुलांचे वाढदिवस, गरोदर मातेचे कार्यक्रम इत्यादी सीबीई कार्यक्रमांतर्गत दोन कार्यक्रम दर महिन्याला घेणे बंद कारक आहे त्यानुसार कार्यक्रम घेतले जातात एका कार्यक्रमाला पाचशे रुपये सरकार देते परंतु अनेक जिल्ह्यात निधी मिळाला आहे परंतु वर्धा जिल्ह्यात मात्र मागील जुलै महिन्यापासून निधी देण्यात आलेला नसत्या मुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे आर्थिक कोंडी केली जात आहे

गणवेश निधी-दरवर्षी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दोन गणवेशासाठी एक हजार रुपये मिळतात परंतु सन २०२४-२०२५ या कालावधीतील गणवेश निधी दिला गेलेला नाही

परिवर्तन निधी- किरकोळ काम करता शासन दरवर्षी दोन हजार रुपये निधी देते वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट समुद्रपूर कारंजा सेलू या प्रकल्पात २०२४ या वर्षातील परिवर्तन निधी देण्यात आलेली नाही इतर प्रकल्पात मात्र देण्यात आलेले आहे

मोबाईल रिचार्ज

ऑनलाइन काम करण्यासाठी तसेच पोषण ट्रॅकर ?प्स माध्यमातून संपूर्ण कामकाज मोबाईल वर भरले जाते शासनाने रजिस्टर लेस म्हणून मोबाईल दिलेला आहे मात्र अनेक दिवसापासून मोबाईल रिचार्ज देण्यात आलेला नाही कामाची शक्ती केली जाते परंतु त्याला लागणारे साहित्य व निधी उपलब्ध करून देण्याचे काम जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचे आहे मोबाईल रिचार्ज न दिल्यास ऑनलाईन काम बंद पडू शकतो ऑनलाइन कामासाठी सेविकांची पिळवणूक केली जाते. ऑनलाइन काम केले नाही तर मानधन काढले जात नाही प्रोत्साहन भत्ता दिला जात नाही

ङअंगणवाडीत मोबाईल व्यतिरिक्त रजिस्टर भरून ठेवण्यासाठी जबरदस्ती प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका करतात. शासनाने ११ रजिस्टर चा बोजा कमी करण्यासाठी मोबाईल दिले याची जाणीव असून सुद्धा जिल्हास्तरीय अधिकारी अंगणवाडीत गेल्यावर रजिस्टर मागतात. मागील चार वर्षापासून प्रशासनाकडून अंगणवाडी कर्मचाऱ्यांना रजिस्टर पूरवठा केल्या गेला नाही

इत्यादी अनेक प्रश्नांवर बैठकीत चर्चा करण्यात आली स्थानिक जिल्हा पातळीवरील प्रश्न निकाली काढण्यासाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी दर तिन महिन्याला होणाऱ्या तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करून तात्काळ स्थानिक प्रश्न निकाली काढण्याची विनंती करण्यात आलेली आहे जिल्हा प्रशासनाने स्थानिक प्रश्न निकाली न काढल्यास ३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती दिनापासून तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे

बैठकीचे संचालन व प्रस्ताविक जिल्हा सचिव वंदना कोळणकर यांनी केले

मैना उईके ज्ञानेश्वरी डंबारे अलका भानसे हिरा बावणे रेखा काचोडे कुसुम तडस प्रतिभा नैताम प्रज्ञा ढाले बेबी धारपुरे अरुणा नागोसे करुणा शंभरकर आशा गळहाट रजनी पाटील मंगला उईके सुषमा ढोक विजया उरकुडे यांनी आपले मत व्यक्त केले

बैठकीत २०२४ सभासद वर्गणी व लढा निधी तात्काळ जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच तालुकास्तरीय मेळावे आयोजित करून २०२५ सालाची सभासद वर्गणी पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. आभार व समारोप मैना उईके यांनी केले



श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी कार्यक्रम साजरा



नागपूर ■ दिलीप येवले

हिंगणघाट : जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांच्या मूळ गाथेचे लेखनकर्ते, संत शिरोमणी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रम श्री.साई हॉल, नंदोरी रोड येथे पार पडला.याप्रसंगी संत संताजी जगनाडे महाराजांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे कार्य अतुल वांदिले यांनी मनोगतात व्यक्त केले.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक युवा महासभेचे कार्याध्यक्ष अतुल वांदिले, योगेश्वर महाराज, चंद्रकांत वाढई, किरण वैद्य, साखरकर गुरूजी, संदीप रेवतकर, मधुकरराव चाफले गुरुजी, दशरथ ठाकरे, बालु वानखेडे,अमोल बोरकर, वामनराव गिरी, मधुकरराव खडसे, किशोर शेगोकार, भाऊराव कोटकर, शंकर देशमुख, किशोर गाठे, सुनील भुते, किशोर चांभारे, सुधाकर वाढई, जगदिश वांदिले, बंटी रघाटाटे, बचू कलोडे, गजानन महाकाळकर, जगदिश पिसे,अनिल अडकिने,अमोल मुडे,राजू मुडे आदी उपस्थित होते.

निवृत्तीवेतनधारकांना कोषागाराकडे प्रमाणित जीवन प्रमाणपत्र रजिस्टर सादर करण्याचे आवाहन

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूरः जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांचे ज्या बँकामधुन निवृत्ती वेतन आरहित होते त्या बँक शाखेकडून जीवन प्रमाणप्रत्राचे रजिस्टर प्रमाणित करण्याचे आवाहन, अपर कोषागारे (निवृत्त वेतन) अधिकारी यांनी केले आहे. निवृत्तीवेतनधारकांनी आपापल्या बँकाकडे पाठपुरावा करुन जीवन प्रमाणपत्राचे रजिस्टर प्रमाणित करण्यासंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना कोषागाराकडुन देण्यात आल्या आहेत. संबंधित बँकांना यापूर्वीच कोषागाराकडून मुदत देण्यात आली होती.

निवृत्तीवेतनधारकांनी जीवन प्रमाणपत्राचे रजिस्टर प्रमाणित करुन कोषागारास सादर न केल्यास निवृत्तीवेतन अदा करण्यास विलंब होऊ शकतो, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

नागरी सेवा परीक्षेच्या मुलाखतीसाठी दिल्लीत निःशुल्क 'अभिरुप मुलाखत प्रशिक्षण'

महाराष्ट्र सदनात ४ जानेवारी ते ६ एप्रिल दरम्यान प्रशिक्षण

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४-२५ उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या राज्यातील उमेदवारांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने ४ जानेवारी ते ६ एप्रिल २०२५ दरम्यान नवी दिल्ली येथील जुन्या महाराष्ट्र सदनात 'अभिरुप मुलाखत प्रशिक्षण २०२४-२५' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पात्र उमेदवारांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक तथा भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपुरचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी केले आहे.

'केंद्रीय लोकसेवा आयोगा' च्या नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४-२५ परीक्षेचा निकाल ८ डिसेंबर २०२४ रोजी घोषित झाला असून मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकाराने अभिरुप मुलाखत प्रशिक्षण २०२४-२५ कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातर्फे करण्यात आले आहे.या कार्यक्रमातंर्गत उमेदवारांसाठी अभिरुप मुलाखती सत्रांचे ४ जानेवारी ते ६ एप्रिल २०२५ दरम्यान येणा-या प्रत्येक शनिवार व रविवारी दिल्लीतील जुने महाराष्ट्र सदन, कोपरनिकस मार्ग, मंडी हाऊस जवळ, नवी दिल्ली-११०००१ आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी ॅ.ग्म.दु.ग्ह या संकेतस्थळावरील सविस्तर सूचना बघावी. अथवा चौकशी संदर्भात ्गिमूर्दीर्गेहुर्जुर्स्ग्त.म्दस् या ईमेलवर चौकशी करावी. संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५६२६ या दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्र. ९४२२१०९१६८ या क्रमांकावर संपर्क साधावा. तथा मुलाखती संदर्भातील प्रवेश अर्ज जुने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील मुलाखत केंद्रावर उपलब्ध करुन देण्यात येईल. अर्जासोबत युपीएससीचे मुलाखत पत्र, डोमेसाईल प्रमाणपत्र आणि पासपोर्ट आकारातील फोटो आणावीत. तसेच प्रत्येक उमेदवारांनी मुलाखतीस येतांना ॐ.इ. च्या ०६ छायांकीत प्रती व एक पासपोर्ट फोटो न चुकता सोबत आणावेत, असे प्रसिद्धीप्रत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

जनजागरण रँली व सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न



वर्धा ■ प्रतिनिधी

तळेगाव शा. प. येथील स्व. वत्सलाबाई गोहाड कनिष्ठ महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनातील श्रमसंस्कार व जनजागरण शिबीर ग्राम टेकोडा येथे सर्व स्वयंसेवक यांनी विविध वेशभूषा करून संपूर्ण गावात ग्राम दिंडीतुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजन व विविध घोषवाक्य म्हणत सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी रँली काढण्यात आली. या कार्यक्रमाला टेकोडा ग्राम पंचायत टेकोडा सौ. ज्योतीताई कडु उपसरपंच , निलेश वानखडे व ग्रा. प. सदस्या सौ. उज्वला ताई कुयटे, प्राचार्य चंद्रकांत ताथोडे यांनी हिरवी झेंडी दाखवली. तर दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्य व विविध नृत्य सादर करण्यात आले. यावेळी गावातील लोकांचा अभुतपूर्व उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. उमेश पवार प्रा देवेंद्र कुमावत, प्रा. सुरज डोईजड प्रा. स्वाती खेरडे व स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

अडेगाव जि.प.शाळेत एक्स्पर्ट टॉक उपक्रमा अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विषयावर कार्यशाळा

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : देवळी तालुक्यातील अडेगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे एक्स्पर्ट टॉक उपक्रमा अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून वर्धा येथील जानकीदेवी बजाज कॉलेज ऑफ सायन्सचे डॉ. सुधिर टिपले उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात विज्ञान व अवकाशातील घडामोडी या विषयी प्रभावी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर पावलोपावली का व कसे हे प्रश्न पडायला पाहिजे. या प्रश्नांची अचूक उत्तरे चिकित्सकपणे शोधायला हवीत, शिक्षकांना विचारायला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. टिपले यांनी केले. मुलांमध्ये रममाण होऊन काही प्रात्यक्षिके करुन दाखविली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नरेन्द्र गाडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीकरीता यशोदा मांडवगडे, उदय डिघिकर, अर्चना बोंद्रे, अभय धाबर्डे, मयुरी मरस्कोल्हे, कोमल नागपुरे, वैष्णवी काटकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान शिक्षिका वर्षा पट्टेवार यांनी केले.

संत विचाराच्या परिस्पर्शानेच मानवी जीवनाचा उद्धार होतो : राष्ट्रीय कीर्तनकार गजानन महाराज भोरे यांचे प्रतीपादन

नवीन आष्टी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतीथी महोत्सव उत्साहात साजरा

लहान आर्वी ■ सुनिल साबळे

लहान आर्वीः- विज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी आनंद मात्र बाजारात विकत घेतला जात नाही. कारण तंत्रज्ञानाच्या काळात शाश्वत आनंद मात्र हरवला. तो पुन्हा प्राप्त करायचा असेल तर संत विचारांच्या परिसस्पर्शाशिवाय मानवी जीवनाचा उद्धार नाही असे प्रतिपादन राष्ट्रीय समाज प्रबोधनकार ग्रामगीताचार्य गजानन महाराज भोरे यांनी गोपाल काल्याचे कीर्तनातून व्यक्त केले.

(नवीन)आष्टी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५६ वा पुण्यतिथी महोत्सव दिनांक २१ पासून तर दिनांक २२ पर्यंत विविध सामाजिक धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यात सामुदायिक ध्यान,सामुदायिक प्रार्थना,महिला मेळावा व ग्रामगीताचाऱ्यांचा परिसंवाद आधी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदरहू कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्याकरता विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून मार्गदर्शन केले. दिनांक २२ ला सकाळी नवीन आष्टी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भव्य शोभायात्रा काढून दहा ते अकरा गावातील महिला पुरुष भजन मंडळांनी शोभायात्रेत सहभाग नोंदवला होता. सळा समारजन रांगोळ्या काढून देवी देवता राष्ट्रपुरुषांच्या, महामानवांच्या प्रतिमा ठेवून शोभायात्रेचे जय्यत स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतीकरता श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या सर्व माता भगिनी पुरुष मंडळी गोपाल गोपालांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केले. दुपारी अकरा वाजता राष्ट्रीय समाज प्रबोधनकार ग्रामगीताचार्य ह भ प गजानन महाराज भोरे यांचे गोपाल खाल्यावर कीर्तन झाले. साथ संगती हार्मोनियम वादक जगदीश महाराज शेळके, मृदंग वादक अरुण महाराज ठोंबरे, गायक किसनराव महाराज बहुरूपी, कंठा भाऊ बहुरूपी,गंगाधर चंदीवाले, डांगे महाराज आदींची उपस्थिती होती, त्यानंतर समायोजित मान्यवरांची भाषणे व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होती.



शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध : आमदार श्री. सुधाकर अडबाले

जुनी पेन्शनसह प्रलंबित विविध मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनादरम्यान विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नागपुरात धरणे आंदोलन संपन्न

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सभागृहात मांडून सोडविण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध असून, प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी आंदोलनाप्रसंगी दिली.

राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व खाजगी अनुदानित विजाभज / आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्?या शासनदरबारी प्रलंबित आहेत. प्रलंबित समस्या सोडविण्याकरीता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने माजी आमदार श्री. व्?ही. यू. डायगव्?हाणे यांच्या मार्गदर्शनात व विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार श्री. सुधाकर अडबाले, अध्यक्ष श्री. अरविंद देशमुख यांच्या नेतृत्?वात हिवाळी अधिवेशनादरम्यान यशवंत स्टेडियम, नागपूर येथे १९ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेंशन योजना लागू करावी, विना अनुदानित/अंशतः अनुदानित शाळांना प्रचलित धोरणानुसार १००इ अनुदान मंजूर करण्यात यावे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, दि. १५ मार्च २०२४ यातील संचमान्यतेबाबत जाचक अटी रद्द करण्यात याव्या, राज्यातील अघोषित शाळा व नैसर्गिक वाढीव तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करून आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, न्यायालयीन आदेशाप्रमाणे नागपूर विभागातील आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या विजाभज आश्रमशाळा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता व एकस्तर वेतनश्रेणी योजनेचे लाभ पूर्ववत सुरू करण्यात यावे, न्यायालयीन आदेशाप्रमानुसार आदिवासी विकास विभागाअंतर्गत आश्रमशाळेतील शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ११५५ शिक्षकांना मानधन वेतनाची थकबाकी अदा करण्यात यावी, दत्तक शाळा योजना राबविण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करावा, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय दिनांक २३ ऑगष्ट २०२४ नुसार शिक्षकांची अशैक्षणिक कामांतून मुक्तता करण्यात यावी. तसेच सदर शासन निर्णयाची अमंलबजावणी करण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात यावे यासह अन्?य मागण्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर धरणे आंदोलनात वर्धा जिल्ह्यातील विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयप्रकाश थोटे, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष श्री. वितेश खांडेकर, वर्धा जिल्हाध्यक्ष श्री. विष्णूजी इटनकर, कार्यवाह श्री. महेंद्र सालंकार, श्री. प्रमोद खोडे, श्री. अशोक घारे, श्री. प्रवीण देशमुख, श्री. शशांक हूलके, श्री. सुनील धवणे, श्री. नंदकिशोर ठाकरे, श्री. संदीप चवरे, श्री. संजय घोडमारे, श्री. नरेंद्र ढवळे, श्री. मिलिंद भागवत, खाजगी प्राथमिक शिक्षक संघाचे सचिव श्री. सुरेशकुमार बरे, श्री. संजय बावनकर, श्री. धर्मपाल मानकर, श्री. रवींद्र राठोड, श्री. भारत पाटील, श्री. नरेंद्र गलांडे, श्री. दिनेश वाघ, श्री. उटाणे सर, श्री. सुनील दुधे, श्री. आशुतोष चौधरी, श्री. पुरुषोत्तम हटवार, श्री. सचिन इंगोले तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे तसेच इतर सर्व समविचारी संघटनेचे राज्य, प्रांतीय, जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, पेन्शन फायटर व विदर्भातील विविध विभागाचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

'संघणकाचे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अवगत होण्यास मिळेल मदत' - डॉ. विनय देशपांडे

गुरुकुल इंग्लिश स्कूलला श्रीकांत पेंडकेंनी दिला संघणक संच भेट



आर्वी ■ प्रतिनिधी

आर्वी येथील स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी स्मृती समिती संस्था व्दारा संचालित शाळा गुरुकुल इंग्लिश स्कूलला श्रीकांत पेंडके नगर बौद्धिक प्रमुख आर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनी संगणक संच भेट म्हणून दिला.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि संगणकाच्या युगात विद्यार्थी दशेतील लहानग्यांना सुलभतेने संघणक हाताळने शक्य व्हावे म्हणून भेट रुपात मिळालेल्या संघणक संचाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. संघणकाचे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अवगत होण्यास मिळेल मदत होईल असे डॉक्टर विनय देशपांडे अध्यक्ष वर्धा नगरी सहकारी अधिकोष व अध्यक्ष स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी स्मृती समिती आर्वी यांनी सांगितले.

या प्रसंगी डॉक्टर विनय देशपांडे अध्यक्ष वर्धा नगरी सहकारी अधिकोष व अध्यक्ष स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी स्मृती समिती आर्वी, योगेश ताजनेकर

सचिव स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी स्मृती समिती आर्वी, मयूर पोकळे, हर्षल देशमुख, अमोल मुधोळकर, प्रणित लोखंडे यांच्यासह योगिता लोखंडे, दर्शना आपकाजे, श्रेया राऊत या शिक्षकांसह कर्मचारी अरुणा नादेकर, कविता सातपुते यांची उपस्थिती होती.

संतोष देशमुख यांच्या न्यायासाठी लाखोंचा मोर्चा ; आनेक नेत्यांसह सामान्य जनता रस्त्यावर उतरली मोर्चात सर्व जाती धर्माच्या लोकांचा सहभाग

बीड ■ तात्या गवळी





बीड : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी फरार असलेले आरोपींना अटक करुन त्यांना फाशी द्यावी या मागणीसाठी आज शनिवारी (दि. २८) बीड येथे सर्व जातीच्या जनतेचा व सर्व पक्षीय विराट मोर्चा काढला. हा मोर्चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन मोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा माळीवेस चौक, सुभाष रोड, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे याचा सभेत रुपांतर होऊन यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले.

यावेळी आंदोलनांमध्ये मोठा रोष दिसून आला तसेच हातात काळे झेंडेआणि विविध मागण्यांचे फलक होते. सर्वांची एकच मागणी होती तीफरार आरोपींना अटक करुन फाशी द्या

किरकोळ वाद सोडवून परिसरात शांतता कायम रहावी यासाठी प्रयत्न करणारे सरपंच संतोष देशमुख यांची काही गुंडांनी अपहरण करुन त्यांना अमानुष मारहाण करुन अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या केली. या घटनेला १९ दिवस झाले असले तरी यातील आरोपी आणि सुत्रधार फरार आहेत. या फरार आरोपींचा शोध लावून त्यांना फाशी द्यावी या मागणीसाठी सर्व पक्षीय व जाती धर्माच्या लोकांचा विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये फक्त बीड जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नागरिक उपस्थित होते. यावेळी मोर्चामुळे अख्खे बीड शहर जाम झाले होते. तब्बल तीन किलोमीटर रांग होती. तर आंदोलनांमध्ये मारेकऱ्यांबाबत प्रचंड रोष दिसून आला. हातात केळे झेंडे घेऊन आंदोक आंदोलनात पोहोचले होते. विविध फलक हातात घेऊन त्यामाध्यमातून विविध मागण्या लक्ष वेधून घेत होते. अनेकांनी यावेळी बीड जिल्ह्यातील दहशतीवर भाष्य करीत आरोपींना अटक करुन फाशी देण्याची मागणी केली. १८ दिवस झाले तरी आरोपी का सापडत नाही. असा प्रश्न उपस्थित करीत पोलिसांवर संशय व्यक्त करीत आरोपी जर नाही पकडले तर मुंबईला धडक देऊ अशी प्रतिक्रिया महिलांनी उपस्थित केली. या मोर्चाच्या गर्दीने आजपर्यंत सर्व मोर्चाचे रेकॉर्ड मोडल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. या मोर्चामध्ये महिला व मुलांची लक्षणीय उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा धडकल्यानंतर मान्यवरांची भाषणे झाली. यानंतर विविध मागण्यांचेनिवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

संतोष देशमुख यांना न्याय नाही मिळाला तर जनतेच्या आक्रोशाचा सामना सरकारला करावा लागणार, ही लोकं सापाला दूध का पाजतात असा प्रश्न उपस्थित करून धनंजय मुंडे यांना टोला लगावला आहे.

-मनोज जरांगे पाटील

मंत्री मुंडे यांना माहित आहे. बीड जिल्ह्यातील अन्यायाला संतोष देशमुख हत्येमुळे वाचा फुटली.

-छत्रपती संभाजीराजे भोसले

सर्वांना सोबत घेऊन चालणारा सरपंच संतोष देशमुख यांना मुख्यमंत्री यांनी मनसूख प्रमाणे न्याय द्यावा, मुख्यमंत्री कोणाच्या दबावाखाली काम करीत आहेत. अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांना मंत्रिपदावरुन हाकलून द्यावे, ती हत्या माणुसकीची असून यामुळे न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही.

नरेंद्र पाटील

वाल्मिक कराड रक्त पिपासू असून, याला सरकारच पाठीशी घालत असल्याचा आरोप करीत. जातपात काही नाही. हे सिरीयल किलर असून अनेक वंजाऱ्यांचे संसार याने उध्वस्त केले. बीडची जनता तशी सहनशील आहे.

-आ. जितेंद्र आव्हाड

जी जनतेची भावना तीच माझी भावना असून, सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झालीच पाहिजे आणि फरार आरोपींना तातडीने अटक करावी. -आ. विजयसिंह पंडित

संतोष यांची हत्या ही तरुण कार्यकर्त्याची हत्या. तातडीने फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी ही आमची मागणी आहे.

डॉ. ज्योती मेटे

सर्वांनी एकत्र येत माझ्या वडिलांना न्याय मिळवून द्या : वैभवी देशमुख

मोर्चाच्या शेवटी झालेल्या सभेमध्ये मयत सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी हिने अत्यंत भावना विवश होत भाषण केले माझे वडील आता मातीच्या आड गेले आहेत मला आता ते कधीच भेटणार नाहीत. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांच्या न्यायासाठी सगळे एकत्र या, मला तुमची गरज आहे माझ्या कुटुंबासोबत राहा आणि न्याय मिळवून द्या असे भावनिक आवाहन यावेळी तिने केले.

सौ स्वाती संतोष मांडके युवा उद्योजिका पुरस्काराने सन्मानित

रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती : साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी यांच्यावतीने शिरूर तालुक्यातील विविध व्यवसायिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या यशस्वी युवा उद्योजक व उद्योजिका अशा मान्यवरांना 'शिरूर तालुका यशस्वी उद्योजक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले .यावेळी सौ. स्वाती संतोष मांडके यांना युवा उद्योजिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार स्विकारताना सौ स्वाती संतोष मांडके म्हणाल्या, 'मांडके अमृततुल्य अँड गिफ्ट हाऊस' हा व्यवसाय रांजणगाव गणपती.ता.शिरूर येथील महागणपती मंदिराजवळ आहे.हा व्यवसाय चालू करायला मला माझ्या पतीचे मोलाचे सहकार्य मिळाले.मी मनापासून विचार करून माझ्या आवडीनुसार व्यवसायाची निवड केली .या व्यवसायातून माझ्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळून आम्हास नावलौकिक प्राप्त झाला आहे.सासरच्या माणसांसह माझे पती संतोष मांडके यांनी मला पाठिंबा दिला व वेळोवेळी मदत केली.

'सुरुवातीला सर्वांना वाटायची की महीला हा व्यवसाय करू शकेल का?'पण मी तो यशस्वी केला. ग्राहकांना उत्तम गुणवत्तापूर्ण सेवा आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे मला मागे वळावे लागले नाही. या व्यवसायातून आम्ही कॅरॅमल व पिराजीत केक शॉप ही नविन दुकान चालू केले आहेत.

त्यांच्या ह्याच कार्याची दखल साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी संपादक व सामाजिक कार्यकर्ते विवेकानंद फंड यांनी घेतली.यशस्वी उद्योजिका सौ स्वाती संतोष मांडके यांना युवा उद्योजिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी मा. तृप्ती देसाई संस्थापक अध्यक्षा भूमाता ब्रिगेड, संदीप दौंडकर उपाध्यक्ष रांजणगाव देवस्थान ट्रस्ट , आनंदा बारवकर संपादक साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी, विवेकानंद फंड सहसचिव द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य, ओंकार देव मुख्य विश्वस्त रांजणगाव देवस्थान ट्रस्ट,मंगलताई सासवडे भूमाता ब्रिगेड शिरूर तालुका अध्यक्षा, धनंजय गायकवाड अखिल भारतीय ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य प्रांत अध्यक्ष, डी डी बारवकर भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुणे जिल्हा सरचिटणीस, , शकील मनियार पुणे जिल्हाध्यक्ष द युवा ग्रामीण पत्रकार संघटना, अनिल बत्ते अध्यक्ष भूमाता ब्रिगेड शिरूर तालुका तसेच महाराष्ट्राची भूमीचे सर्व पत्रकार पदाधिकारी उपस्थित होते यावेळी प्रशीस्तीपत्र, पुष्पगुच्छ,फेटा, सन्मानचिन्ह देऊन युवा उद्योजिका सौ. स्वाती संतोष मांडके यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी आदर्श उद्योजक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२२ जानेवारी २०२५ रोजी हनुमान कोळीवाडा (जुना शेवा कोळीवाडा)ग्रामस्थ करणार जेएनपीए चे समुद्र चॅनेल बंद आंदोलन

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरणःरायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील शेवा कोळीवाडा गावातील शेवा बेटावर अनादी काळापासून राहणाऱ्या कोळी समाजावर जिल्हा प्रशासन व जेएनपीए प्रशासनाने पुनर्वसन, रोजीरोटीसाठी नोकरीची शासन ठरावात हमी देवून त्याचे आजतागायत अनुपालन न करता गेल्या ४० वर्षात मानवी जीविताचा छळ मांडला आहे.मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी शेवा कोळीवाडा गावठाण देशातील आधुनिक बंदरासाठी संपादन करून एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा गावातील शेतकरी/बिगर शेतकरी २५६ कुटुंबांचे मौजे बोरीपाखाडी, उरण येथे १७.२८ हेक्टर जमिनीत दि. १२/११/१९८२ ते १२/०३/१९८७ मध्ये पायरी पायरीने शासनाचे मापदंडाने कागदोपत्री पुनर्वसन व विस्थापितांना बंदर प्रकल्पात रोजीरोटीसाठी नोकरी देण्याचे मंजूर केले होते. मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी मौजे बोरीपाखाडी, उरण येथील जमिनीवर शासनाचे मापदंडाने मंजूर केलेल्या दि.०८/०८/१९८५ रोजीचे नकाशात ७.१४ हेक्टर जमीन २५६ भूखंडासाठी दिली होती आणि १०.१४ हेक्टर जमीन नागरी सुविधेसाठी दिली होती. त्या नकाशात मुख्य रस्ते ४० फुट (१२ मीटर) रुंदीचे होते आणि जोड रस्ते ३० फुट (९ मीटर) रुंदींचे होते.जेएनपीटी (जेएनपीए)व्यवस्थापणांने फंड कमी दिल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी १७.२८ हेक्टर जमिनी पैकी एप्रिल १९८६ पासून ९१ गुंठे जमिनीत 'संक्रमण शिबिरात' आजतागायत ठेवलेले आहे. तेव्हापासून मा. जिल्हाधिकारी यांनी पुनर्वसनाचा सत्य अहवाल केंद्र व राज्य सरकारला देवून पाठपुरावा करून आजतागायत १७.२८ हेक्टर जमिनीत पुनर्वसन केलेले नाही. एनएसपीटी /जेएनपीटी व्यवस्थापन यांनी मा. जिल्हाधिकारी रायगड यांना सन १९८५-८६ मध्ये फक्त रुपये १६ लक्ष रक्कम शेतजमीन विकसित व नागरी सुविधा देण्यासाठी दिली होती. त्या रक्कमेत त्या काळात मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी मौजे बोरीपाखाडी, उरण येथील १७.२८ हेक्टर शेतजमिनी पैकी २ हेक्टर शेतजमीन विकसित करून व नागरी सुविधा दिलेल्या आहेत. आणि त्या काळापासून संक्रमण शिबिराला लागून असलेली १५ हेक्टर शेतजमीन आजतागायत पडीत आहे. मा. उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी १७.२८ हेक्टर जमिनीपैकी एप्रिल १९८६ पासून ९१ गुंठे जमिनीत 'संक्रमण शिबिरात' ठेवून वर दि.१७/०२/१९९० रोजी शेवा कोळीवाडा गावाचे ७.२१ हेक्टर गावठाण संपादन केले आहे. त्या बदल्यात मौजे बोरीपाखाडी उरण येथे ६.१५ हेक्टर नवीन गावठाण दिले आहे. ती ६.१५ हेक्टर जमीन वाटपाची यादी नाही. त्या आज्ञापत्रात १०५ इसमाना ९१ गुंठे जमीन वाटपाची यादी तयार करून बनावट आज्ञापत्र केलेले आहे. त्या बनावट दस्तावेजाने एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा यांचा मा. उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी छळ केलेला आहे.त्यामुळे संतप्त झालेल्या हनुमान कोळीवाडा (जुना शेवा कोळीवाडा)ग्रामस्थांनी २२ जानेवारी २०२५ रोजी जेएनपीटी (जेएनपीए)च्या समुद्र मार्गात चॅनेल बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.सदर चॅनेल बंद करण्यासाठी शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ व शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने पुढाकार घेतला आहे.

जेएनपीए व्यवस्थापनाने शेवा बेटाच्या सभोवतालच्या मासेमारी जमिनीत प्रकल्पासाठी सन १९८४ साली १४६ हेक्टरचा भराव केला आहे. तसेच शालोबर्थसाठी ३० हेक्टरचा भराव, एनएसआयजीटी प्रकल्पासाठी ३० हेक्टरचा भराव, बल्क टर्मिनल टू कंटेनर टर्मिनलसाठी १८ हेक्टरचा भराव, एनएसआयजीटी ३३० मीटर कंटेनर टर्मिनलसाठी २७.५ हेक्टरचा भराव, बीएमसीटीपीएल फेज १ साठी ९० हेक्टरचा भराव,पोर्ट बर्थसाठी ३९ हेक्टरचा भराव, बीएमसीटीपीएल च्या रस्त्यासाठी १९.५ हेक्टरचा भराव, टँक फार्मसाठी ६०० हेक्टर भराव, पार्किंगसाठी ५०० हेक्टर भराव, जेएनपीटी सेझ साठी ३०० हेक्टर भराव, बीएमसीटीपीएल फेज २ साठी ११० हेक्टर भराव, रस्ते रुंदीकरणासाठी भराव असे मासेमारी जमिनीत भराव करून तयार केलेल्या जमिनीच्या समोर मासेमारी जमिनीत सुमारे ६ किलो मीटर लांबीचे माल चढ उतार करण्यासाठी धक्के व त्या धक्यावरून जहाजात माल भरण्यासाठी त्या धक्क्यांना जागो जागी अनेक पोच रस्ते बांधले आहेत. आणि धक्क्यांचे समोर मासेमारी जमिनीत मालवाहू जहाजे लावण्यासाठी व फिरवण्यासाठी खुदाई करून खोली केलेली आहे. वगैरे वगैरे असा टप्प्या- टप्प्याने मासेमारी जमिनीत एनएसपीटी /जेएनपीटी /जेएनपीए, टँक फार्म , सेझ वगैरे वगैरे प्रकल्प उभे केले आहेत. आणि कायमची मासेमारी जमीन घेतलेली आहे. त्या कायमच्या घेतलेल्या मासेमारी जमिनीचा मोबदला शेवा बेटावर वसलेल्या शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) गावातील प्रकल्प बाधित पारंपारीक मच्छिमारांना दिलेला नाही. आणि सन १९८३ पासून आजतागायत गेल्या ४१ वर्षात रायगड जिल्ह्यातील सर्व कोळीवाड्यातील एकाही कोळी बांधवाना / प्रकल्प बाधित पारंपारीक मच्छीमाराला जेएनपीटी (जेएनपीए)मध्ये परमनंट / ठेकेदारीत एकही नोकरी दिलेली नाही.विनंती अर्ज समिती, मा. केंद्रीय बंदर मंत्री व मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. पुनर्वसन मंत्री, मा. लोकायुक्त, मा. जिल्हाधिकारी यांनी जेएनपीटीला शेवा कोळीवाडा गावाचे १७ हेक्टर जमिनीत पहिलेच पुनर्वसन करत आहे. असा केंद्र सरकारला प्रस्ताव देण्याचा आणि पाठपुरावा करून मंजूरी घेवून येण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याचा अनेक वर्ष अवमान करून नंतर जेएनपीए व्यवस्थापन हनुमान कोळीवाडा दुबार पुनर्वसन असे असत्य लिहीत असल्याने केंद्र सरकार अनेक त्रुटी काढून जेएनपीए व्यवस्थापनाकडे खुलासे मागवत आहे. पण जेएनपीए व्यवस्थापन केंद्र सरकारला शेवा कोळीवाडा गावातील २५६ कटुंबांचे पहिलेच शासनाचे मापदंडाने १७ हेक्टर जमिनीत मंजूर असलेले पुनर्वसन जेएनपीए च्या विकसित जमिनीत करत आहे. असे आजतागायत केंद्र सरकारला खरे सांगत नाही. म्हणून केंद्र सरकारने मंजूरी दिलेली नाही, त्याच्या निषेधार्थ शेवा कोळीवाडा गावातील विस्थापितांनी दि. २२ जानेवारी २०२५ रोजी जेएनपीएचे समुद्र मार्गे चॅनेल बंद आंदोलन करणार असल्याचे जाहीर केलेले आहे. त्यासाठी कोकणातील सर्व संस्थांनी बोटी/होड्या घेवून यावे आणि कोळी समाजाला पाठींबा द्यावा असे आवाहन शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ तसेच शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वातील न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेचा यावर्षातील १४ वा पगारवाढीचा करार !

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातील कामगारांसाठी पगारवाढीचा करार !



उरण : रायगड जिल्ह्यातील पनवेल -उरण तालुक्यामधे दानशुर व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे तसेच कामगारांना सातत्याने न्याय देवून कामगारांचे जिवनमान उंचावणारे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वातील न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटना हि एकमेव संघटना आहे की संघटनेच्या माध्यमातून यावर्षी १४ कंपन्यांतील कामगारांसाठी पगारवाढीचे करार करण्यात आले. यावर्षातील १४ वा पगारवाढीचा करार मे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ या व्यवस्थापनेतील मे. गॅड लॉजिस्टीक्स प्रा. ली., या कंत्राटाअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांसाठी करण्यात आला. या करारनाम्यानुसार कामगारांना ४००० रुपये पगारवाढ, बोनस, रजा, मेडिक्लेम देण्याचे मान्य करण्यात आले आहे. केंद्रसरकारच्या डीपीडी धोरणामुळे सीएफएस मध्ये कामगार कपात होताना दिसत आहे.अशावेळी कामगारांचा रोजगार टिकवून ठेवण्याबरोबरच कामगारांच्या गरजा पूर्ण करण्याकरता पगारवाढ होणे सुद्धा आवश्यक आहे.कंपनी व कामगार यांची योग्य सांगड घालून कामगार नेते महेंद्रशेठ घरत आपल्या कार्यकौशल्याने सातत्याने कामगारांसाठी पगारवाढीचे करार करताना दिसत आहेत.

या करारनाम्याप्रसंगी संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील , व्यवस्थापनातर्फे विलास वर्तक, वेळसकर. कामगार प्रतिनिधी चंद्रकांत ठाकू, प्रल्हाद ठाकूर, राजेश पाटील आदि उपस्थित होते.

सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यू प्रकरणात पोलिसांएवढेच कारागृह प्रशासनही दोषी !

परभणी ■ दत्तात्रय काळे

आयोगाचे सदस्य ॲड.लोखंडे यांचा खळबळजनक दावा



परभणी : पोलिसी अत्याचाराचा बळी ठरलेला सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणास पोलिसां एवढेच कारागृह प्रशासनही जबाबदार असल्याचा खळबळजनक दावा महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य तथा राज्य सरकारच्या सचिव दर्जाचे अधिकारी ?ड.गोरक्ष लोखंडे यांनी केला आहे.

परभणी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ?ड.लोखंडे हे माध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले की, सोमनाथनं कायद्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जनसेवा करण्याचं स्वप्न उराशी बाळगलं होतं. तथापि बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा व त्यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाचा सोमनाथ मोठा चाहता होता. संविधानाच्या प्रतिकृतीची झालेली विटंबना त्याला वेदनादायी वाटली. त्याचाच परिपाक म्हणून विटंबना विरोधी बंदमध्ये सोमनाथ सुद्धा सहभागी झाला होता. पोलिसांकडून पुरुष व महिला आंदोलकांवर होत असलेला अमानवीय असा बेछूट लाठीमार कदाचित त्याला बघवत नसावा, म्हणून तो ते सर्व निंदनीय चित्र आपल्या मोबाईलमध्ये कैद करीत होता. तथापि वक्रदृष्टी व रागाने बेभान पोलिसांनी सोमनाथला आपल्याश शिकंजात ओढून बेदम मार मारत बदडून काढले.

? त्याच अमानवीय अशा पोलिसी अत्याचाराचा सोमनाथ हा बळी ठरला गेला. त्याचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला. त्यामुळे सोमनाथच्या मृत्यूस पोलीस यंत्रणा जेवढी जबाबदार आहे, तेवढेच जबाबदार कारागृह प्रशासन सुध्दा आहे, असा खळबळजनक दावा आयोगाचे सदस्य ?ड.लोखंडे यांनी केला आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी व निषेधार्ह अशीच असल्याने या संपूर्ण प्रकरणाची सरकारच्या आदेशानुसार न्यायालयीन चौकशी केली जात आहे. आयोगाकडून या प्रकरणी पीडित कुटुंबाला कायदेशीर मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

?ड.लोखंडे हे परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन केले, त्याशिवाय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान झालेल्या जागेचीही त्यांनी यावेळी पाहणी केली. सोमनाथ सूर्यवंशी व आंबेडकरी चळवळीतील धडाडीचे दिवंगत नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांनी सविस्तर चर्चा केली. परभणीत घडलेल्या सर्व घटनाक्रमाची इत्यंभूत माहिती देण्यात आली.

त्यानंतर शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

?ड.लोखंडे यांनी पुढे असंही सांगितले की, परभणीत घडलेली घटना दुर्दैवी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत त्यांच्या मनात अस्मिता आहे, तो प्रत्येकजण पेटून उठला. भारतीय संविधानाचा अवमान झाल्यानंतर आदोलनाने उग्र रुप धारण केले. यात अनेक सुशिक्षित तरुणांवर अजामीनपात्र गुन्हे दाखल झाले. कायद्याचं शिक्षण घेणारा सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलिसी अत्याचाराने बळी घेतला. एखाद्या आंदोलकांवर गुन्हे दाखल करताना पोलीस प्रशासनाने गांभीर्याने विचार करायला हवा होता. सामाजिक आदोलन हाताळताना एवढ्या अमानुषपणे मारहाण कराला नको होते. पोलिसांकडून मारहाण झाल्यानंतर सोमनाथ दोन दिवस न्यायालयीन कोठडीत होता. तेथेच त्याचा मृत्यू झाला. त्या ठिकाणी त्याला काय वेदना होत आहेत, हे पहाणे गरजेचे होते. द्वेषापोटी दुर्लक्षित केले गेले. त्यामुळेच याप्रकरणी पोलीसांबरोबर कारागृह प्रशासनही तेवढेच दोषी असल्याने चौकशीअंती संबंधितांवर कठोर कारवाई नक्कीच झालीच पाहिजे. पोलीस यंत्रणेने कायद्याच्या अस्त्राचा अमानवीय वापर केला असल्याचे निरीक्षण ?ड.लोखंडे यांनी या वेळी नोदविले आहे. आंदोलकांना पोलिसांकडून यावेळी देण्यात आलेली वागणूक बघून हे काय चालले आहे, हा प्रकार सहन न झाल्याने आणि पोलिसांकडून वाढत्या दबावाच्या जबरदस्त धक्क्याने विजय वाकोडे यांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले. सर्व पीडितांना कायदेशीर मदत करु, तसेच पोलीस यंत्रणा, सामान्य रुग्णालय आणि कारागृह प्रशासनाची सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर योग्य प्रकारे कारवाई करण्याची शिफारस राज्य सरकारकडे करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व पीडितांनी आयोगाकडे तक्रारी कराव्यात. लवकरच त्यावर सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत काळे यांचीही उपस्थिती होती.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242